महाराष्ट्र जनशक्ती | ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २६२ वे | दिनांक : १८/०९/२०२६ | वार : शुक्रवार

## मराठवाड्याला मोठा दिलासा; नदीजोड प्रकल्पाचा निर्धार, शेतकऱ्यांची ४८ हजार कोटींची वीजबिले रद्द




**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन छत्रपती संभाजीनगरमध्ये उत्साहात साजरा झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते राष्ट्रध्वजारोहण आणि शहीद स्मारकास मानवंदना देण्यात आली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी मराठवाड्याला दुष्काळमुक्त करण्यासाठी कोकण आणि कृष्णा खोऱ्यातील अतिरिक्त पाणी आणण्याची महत्त्वाची घोषणा केली. सरदार वल्लभभाई पटेल आणि स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानामुळे मराठवाडा मुक्त झाला, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली.

यंदा पावसाने ओढ दिल्याने शेतकरी चिंतेत असले तरी, शासन त्यांच्या पाठीशी उभे आहे. ५ ऑक्टोबरनंतर पंचनाम्याची प्रक्रिया पूर्ण करून नुकसानग्रस्तांना मदत दिली जाईल. सरकारने शेतकऱ्यांची ४८ हजार कोटी रुपयांची जुनी वीजबिले रद्द केली आहेत आणि मोफत वीज दिली जात आहे. 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने'तून आतापर्यंत १५ लाखांहून अधिक शेतकरी कर्जमुक्त झाले आहेत.

पुढच्या पिढीला दुष्काळ पाहू न देण्याच्या संकल्पांतर्गत भीमा खोऱ्यातून ३० टीएमसी, तर उल्हास खोऱ्यातून (कोकण) गोदावरी खोऱ्यात ७० टीएमसी पाणी आणले जाईल. हा नदीजोड प्रकल्प येत्या सात वर्षांत टप्प्याटप्प्याने पूर्ण होईल. सोबतच, शहराची पाणीपुरवठा योजना अंतिम टप्प्यात असून लवकरच प्रत्येक घरात दररोज पिण्याचे पाणी येईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

औद्योगिक विकासाबाबत माहिती देताना मुख्यमंत्री म्हणाले की, समृद्धी महामार्ग आणि पश्चिम उन्नत द्रुतगती मार्गामुळे शेंद्रा-बिडकीनसारखे क्लस्टर आता देशातील प्रमुख केंद्र बनले आहे. टोयोटा, जेएसडब्ल्यू आणि एथर यांसारख्या कंपन्यांच्या गुंतवणुकीमुळे छत्रपती संभाजीनगर देशातील सर्वात मोठे 'इलेक्ट्रिक व्हेईकल्स मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर' बनेल. उद्योग विस्तारासाठी आणखी ८,००० एकर जमीन घेतली जात आहे.

याशिवाय, जालना ड्रायपोर्टचे काम सुरू झाले आहे. शेंद्रा-बिडकीन आणि बिडकीन-ढोरेगाव रस्ते ३,५०० कोटी रुपये खर्च करून सहापदरी केले जात आहेत. शहरात सर्वात लांब उन्नत रस्ता (फ्लायओव्हर) तयार होत असल्याने भविष्यातील वाहतूक कोंडी टळेल.

आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रातही वेगाने काम सुरू आहे. छत्रपती संभाजीनगर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या नवीन इमारतीसाठी ७१० कोटी रुपये, धाराशिवमध्ये ५०० खाटांचे आधुनिक रुग्णालय आणि परळीत ५६५ कोटी रुपये खर्च करून पशुवैद्यकीय महाविद्यालय उभारण्यात येत आहे. या कार्यक्रमास पालकमंत्री संजय शिरसाट, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्यासह विविध खासदार, आमदार, लोकप्रतिनिधी, स्वातंत्र्यसैनिक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

## ठाकरेंचे मुख्यमंत्र्यांना प्रत्युत्तर; शेतकरी कर्जमुक्तीवरून सवाल



**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती, शेतकऱ्यांची दुरवस्था आणि राज्य सरकारचे धोरण यावरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी राज्य आणि केंद्र सरकारवर जोरदार प्रहार केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या वाढदिवसानिमित्त दिवे लावण्याच्या आवाहनावर संताप व्यक्त करताना, "शेतकऱ्यांच्या घरातले वंशाचे दिवे विझत असताना हे दिवे लावून काय साजरे करत आहेत?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला. तसेच, मराठवाड्याचे नेतृत्व जाणीवपूर्वक संपवले जात असल्याचा आरोप करताना गोपीनाथ मुंडेंच्या मृत्यूचे गूढ अद्याप उलगडले सल्याचा दावाही त्यांनी केला. छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकारांशी संवाद साधताना उद्धव ठाकरे म्हणाले की, "आज मराठवाड्याची परिस्थिती अतिशय भीषण आहे. इथे नऊ-नऊ दिवसांनी पाणी येतेय, शेतकऱ्याचे प्राण कंठाशी आले आहेत. मुख्यमंत्री आज मराठवाड्यात होते, पण ते कुठे गेले? वाढदिवस साजरा करायला. मी मोदीजींना वाढदिवसाच्या शुभेच्छा देतो, पण त्यांनी दिवे लावण्याचे आवाहन केले आहे. इकडे लोडशेडिंग आहे, शेतकऱ्याच्या घरातले वंशाचे दिवे विझतायत, शेतकरी आत्महत्या करत आहेत, आणि अशा वेळेला तुम्ही दिवे लावून ते साजरे करताय? याला काय म्हणायचे ते मला कळत नाही.“ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर 'संधी मिळूनही काही न करणारे नाकर्ते' अशी टीका केली होती. याला उत्तर देताना ठाकरे म्हणाले, "मी मुख्यमंत्री असताना कोणीही मागणी न करता दोन लाखांपर्यंतची कर्जमुक्ती केली आणि शिवभोजन थाळी योजना आणली. आज सोशल मीडियावर लोक सांगत आहेत की, 'उद्धव ठाकरेंनी १५ दिवसांत आमची कर्जमुक्ती केली होती'. मी शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यात पैसे टाकले होते. पण गेल्या वर्षी मुख्यमंत्र्यांनी जे 'इतिहासातले सर्वात मोठे पॅकेज' जाहीर केले, त्यातील साडेतीन लाख रुपयांपैकी साडेतीन रुपये तरी शेतकऱ्यांना मिळालेत का?“ सरकारच्या पूर्वतयारीच्या अभावावर बोट ठेवत ठाकरे म्हणाले की, "अल निनोच्या धोक्याची कल्पना असताना तुम्ही आधीच तयारी का केली नाही? कर्नाटक सरकारने दुष्काळ जाहीर करून काम सुरू केले, तुम्ही का नाही करत?" एनडीआरएफच्या (NDRF) निकषांवर टीका करताना ते म्हणाले, "कायदा जनतेसाठी असतो, जनता कायद्यासाठी नाही. आपत्ती आल्यावर जर निकषात बसत नाही म्हणून मदत थांबणार असेल, तर राज्यकर्ते म्हणून तुम्ही नालायक आहात." येत्या काळात नवरात्रीत आणि दसऱ्यानंतर संपूर्ण राज्यभर, विशेषतः मराठवाडा आणि विदर्भात शिवसेनेचे नेते शेतकऱ्यांसाठी राज्यव्यापी आंदोलन करतील, असा इशाराही त्यांनी दिला. ५ ऑक्टोबरनंतर नवरात्रोत्सवाच्या काळातही शिवसेना ठाकरे गटाचे नेते मराठवाडा आणि विदर्भातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर दौरे व आंदोलने करणार असल्याचे उद्धव ठाकरे यांनी सांगितले. पश्चिम विदर्भातही शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर मोर्चा काढला जाणार असल्याचा उल्लेख त्यांनी केला. त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आंदोलन राज्यव्यापी करण्याचे संकेत त्यांनी दिले. मराठवाड्याच्या नेतृत्वाबाबत बोलताना ठाकरेंनी गंभीर आरोप केले. "मराठवाड्याचे नेतृत्व जाणीवपूर्वक संपवले जात आहे. दिवंगत शंकरराव चव्हाण यांनी धरण बांधले, त्यांचे कर्तृत्व कुणी नाकारू शकत नाही. पण सध्याचे सरकार १२ वर्षे सत्तेत राहून मराठवाड्यासाठी काय करत आहे? यांना शेतकरी मेला तरी चालेल, पण कॉन्ट्रॅक्टरसाठी शक्तीपीठ महामार्ग हवाय," अशी टीका त्यांनी केली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १८ सप्टेंबर २०२६


## मराठवाड्याचा इतिहास हा नागरिकांच्या धमन्यांत वाहणारे देशभक्तीचे नाते - डॉ. सायबण्णा घोडके




***फोटो ओळ : मुरूम, ता. उमरगा येथील माधवराव पाटील महाविद्यालयात आयोजित व्याख्यान प्रसंगी डॉ. घोडके बोलताना प्राचार्य व अन्य.***

**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** मराठवाड्याच्या मातीला स्वातंत्र्यलढ्याचा मोठा वारसा लाभला असून तो प्रत्येकाच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. केवळ पुस्तकी ज्ञानापुरता मर्यादित न राहता हा इतिहास आपल्या आचरणात आणि विचारांत उतरवण्याची गरज आहे. मराठवाड्याचा हा इतिहास केवळ इतिहासाच्या पुस्तकातला नसून तो प्रत्येक नागरिकाच्या धमन्यांत वाहणारे देशभक्तीच्या रक्ताचे नाते असल्याचे प्रतिपादन राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. सायबण्णा घोडके यांनी केले. 17 सप्टेंबर 2026 रोजी मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा विभागामार्फत आयोजित व्याख्याना प्रसंगी प्रा. डॉ. सायबण्णा घोडके यांचे ‘मराठवाडा मुक्ती दिन: त्याग, बलिदान आणि प्रेरणा’ या विषयावर सखोल व्याख्यान पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार होते. यावेळी माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. महेश्वर होगाडे, आयक्यूएसीचे समन्वयक प्रा. डॉ. राम बजगिरे यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वातंत्र्यलढ्यातील आणि मराठवाडा मुक्ती संग्रामातील हुतात्म्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. डॉ. घोडके यांनी आपल्या व्याख्यानाची सुरुवात करताना रजाकारांच्या अत्याचाराविरुद्ध मराठवाड्यातील जनतेने दिलेला लढा आणि त्या काळातील अभूतपूर्व त्यागाचे वर्णन केले. शेतकरी, कष्टकरी, सुशिक्षित तरुणांपर्यंत सर्वांनी यात दिलेल्या बलिदानाचे हृदयस्पर्शी दाखले दिले.स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, भाऊसाहेब वैशंपायन आणि बाबुराव परांजपे यांच्यासह अनेक स्वातंत्र्यसैनिकांच्या संघर्षाचा प्रवास त्यांनी उलगडला. जात, धर्म आणि प्रांतीय भेदाभेद विसरून एकात्मतेची भावना जोपासणे हीच खऱ्या अर्थाने हुतात्म्यांना आदरांजली ठरेल, असा संदेश त्यांनी यावेळी दिला.
चौकट : अध्यक्षीय समारोपप्रसंगी डॉ. बिराजदार म्हणाले की, आजच्या तरुण पिढीने आपल्या पूर्वजांच्या त्यागातून प्रेरणा घेऊन राष्ट्रउभारणीत योगदान दिले पाहिजे. फक्त स्वातंत्र्य मिळवणे पुरेसे नसून ते टिकवणे आणि देशाच्या प्रगतीत योगदान देणे ही आजच्या तरुणांची जबाबदारी आहे. मुक्ती संग्रामाचा इतिहास हा आपल्याला सदैव देशप्रेमाची आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा देतो.प्रास्ताविकात मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास आणि त्याचे आजच्या पिढीसाठी असलेले महत्त्व डॉ. जयश्री सोमवंशी यांनी विशद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुजित मटकरी तर आभार डॉ. रमेश आडे यांनी मानले. राष्ट्रगीताने या प्रेरणादायी सोहळ्याची सांगता झाली. यावेळी महाविद्यालयातील विविध शाखेचे विद्यार्थी-विद्यार्थिनी, कर्मचारी वृंद उपस्थित होते.






## इकरा पब्लिक हायस्कूलची कॅरम स्पर्धेत चमकदार कामगिरी



**जळगाव :** जळगाव येथील कांताई हॉलमध्ये पार पडलेल्या तालुकास्तरीय शासकीय क्रीडा स्पर्धेत इकरा पब्लिक हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी कॅरम क्रीडा प्रकारात उल्लेखनीय कामगिरी केली. विविध वयोगटांत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत शाळेच्या पाच खेळाडूंनी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली.जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंमध्ये समी मुजाहिद बागवान (अंडर-14), शेख अबुज़र जलाल (अंडर-17), सय्यद साहिल (अंडर-17), सफवान रईस बागवान (अंडर-17) आणि सैजान मुस्तकीम खान (अंडर-19) यांचा समावेश आहे. या खेळाडूंनी तालुकास्तरीय स्पर्धेत कौशल्यपूर्ण खेळ करत प्रतिस्पर्ध्यांना मात देत आपली छाप पाडली.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. अब्दुल करीम सालार,जनरल सेक्रेटरी एजाज मलिक आणि मुख्याध्यापक शेख शकील यांनी यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांना शाळेचे क्रीडाशिक्षक आमीर खान यांचे मार्गदर्शन लाभले.

## डॉ. झाकीर हुसेन उर्दू हायस्कूल, मुरूम येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : मुरुम येथील डॉ. झाकीर हुसेन उर्दू हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे सचिव सलीम जमादार साहेब होते. त्यांच्या हस्ते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन आणि ध्वजारोहण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते सादर केली.मुख्याध्यापक बागवान सरांचे प्रबोधनात्मक भाषणयावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री. आर. एम. बागवान सर यांनी विद्यार्थ्यांना मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास सांगितला.आपल्या भाषणात बागवान सर म्हणाले, "15 ऑगस्ट 1947 रोजी देश स्वतंत्र झाला, पण मराठवाडा अजूनही निजामाच्या गुलामगिरीत होता. निजाम आणि त्याच्या रझाकारांनी येथील जनतेवर अनन्वित अत्याचार केले. तेव्हा स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, बाबासाहेब परांजपे यांसारख्या थोर स्वातंत्र्य सेनानींनी लढा उभारला. अखेर भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांनी 'ऑपरेशन पोलो' राबवून 17 सप्टेंबर 1948 रोजी मराठवाड्याला निजामाच्या जोखडातून मुक्त केले. म्हणून हा दिवस आपल्यासाठी स्वातंत्र्यापेक्षा कमी नाही."यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्याची जाणीव ठेवून राष्ट्रीय एकात्मता जपण्याचे आवाहन केले.याप्रसंगी शाळेचे फाउंडर डायरेक्टर बंदगी कोतवाल उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्र संचालन नूर कानकुर्ती सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन नूर कानकुर्ती यांनी केले तर जुबेर अत्तार यांनी आभार मानले कार्यक्रमाच्या शेवटी 'जय हिंद, वंदे मातरम्' च्या घोषणा देण्यात आल्या.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १८ सप्टेंबर २०२६

## गौराईचे आगमन

हळूवार सोनपावलांनी
गौराईचे झाले आगमन
भक्तीमय वातावरणात
चैतन्याची उधळण

रूप साजिरे गौराईचे
करुया तिचा साज
हाती हिरव्या बांगड्या
घालूया तिला आज

ओटी भरू गौराईची
धूप दीप लावूनी
मनोभावे पूजा करू
हळद कुंकू वाहूनी

दोन दिवस पूजा अर्चा
निनादे भक्तीचा गजर
झिम्मा फुगडी खेळतांना
सख्या रमती रात्रभर

भोजनास पुरणपोळी
भक्तगण तृप्त होती
सुख समृद्धीचा आशीर्वाद
गौराई सर्वांना देती

भरजरी शालूत नटली
दोन दिवसाची पाहुणी
निरोप तिला देतांना
अश्रू दाटे नयनी



- **रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**

प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103

## जागतिक ओझोन दिनानिमित्त भूगोल विभागातर्फे जनजागृती रॅली




**उमरगा :** जागतिक ओझोन दिनाचे औचित्य साधून श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथील भूगोल विभागाच्या वतीने ओझोन थराच्या संरक्षणाबाबत जनजागृती करण्यासाठी रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅलीची सुरुवात महाविद्यालयाच्या प्रांगणात प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आली. त्यानंतर रॅलीने तहसील कार्यालय व परिसरातून मार्गक्रमण करत नागरिकांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती केली.रॅलीमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी आणि असंख्य विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी हातात विविध जनजागृतीपर फलक घेऊन "ओझोन वाचवा, पृथ्वी वाचवा", "ओझोन थराचे संरक्षण करा", "पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज" अशा घोषणांद्वारे नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.यावेळी प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "ओझोनचा थर हा पृथ्वीभोवती असलेला एक नैसर्गिक संरक्षक कवच असून, सूर्यापासून येणाऱ्या हानिकारक अतिनील किरणांपासून मानवासह संपूर्ण जीवसृष्टीचे संरक्षण करण्यामध्ये त्याची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. ओझोन थराचे क्षरण झाल्यास मानवाच्या आरोग्यावर, वनस्पती, प्राणी तसेच संपूर्ण पर्यावरणावर गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे ओझोन थराचे संरक्षण करणे ही केवळ शासनाची किंवा पर्यावरण क्षेत्रातील संस्थांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे."ते पुढे म्हणाले की, पर्यावरणपूरक साधनांचा वापर, ऊर्जा बचत, प्रदूषण नियंत्रण, हरित क्षेत्राचे संवर्धन आणि पर्यावरणाविषयी जनजागृती या माध्यमातून प्रत्येक व्यक्ती पर्यावरण संरक्षणामध्ये महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकते. विद्यार्थ्यांनी केवळ ओझोन दिनापुरती जनजागृती न करता वर्षभर पर्यावरण संवर्धनाच्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा. "ओझोनचे संरक्षण म्हणजे केवळ एका थराचे संरक्षण नव्हे, तर पृथ्वीवरील संपूर्ण जीवसृष्टीच्या सुरक्षित भविष्याचे संरक्षण आहे," असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले.या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. देवरकर, डॉ. पी. ए. पिटले, तसेच डॉ. डी. बी. ढोबळे, डॉ. डी. एस. चित्तमपल्ले, डॉ. बी. ए. शेळके, डॉ. आर. एम. सूर्यवंशी आणि डॉ. एस. पी. पसरकल्ले यांची प्रमुख उपस्थिती होती.रॅलीच्या यशस्वी आयोजनासाठी भूगोल विभागातील डॉ. डी. एस. इटले, डॉ. एस. एल. राठोड, डॉ. एस. डी. गावित, डॉ. ए. के. कटके आणि डॉ. बी. पी. गायकवाड यांनी परिश्रम घेतले.विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे रॅलीला उत्साहाचे स्वरूप प्राप्त झाले. तहसील कार्यालय व परिसरात रॅलीदरम्यान विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धन आणि ओझोन संरक्षणाचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविला. "ओझोनचे संरक्षण म्हणजे भावी पिढीचे संरक्षण" हा संदेश देत रॅलीचा समारोप करण्यात आला.

## श्री संत सावता माळी महाविद्यालयात "हैदराबाद मुक्तीसंग्राम" दिन साजरा



**फुलंब्री :** इतिहास विभागाच्या वतीने 'हैदराबाद मुक्तीसंग्राम दिन' प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांच्या हस्ते ध्वजारोहण करून साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. राजाराम जेवे उपस्थित होते. अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले उपस्थित होते. प्रमुख वक्ते म्हणून बोलत असताना डॉ. जेवे म्हणाले की, भारतामध्ये एकूण ५६२ संस्थाने होती. हैदराबाद संस्थान उदयाला येण्या अगोदरचा इतिहास सविस्तरपणे मांडला. हैदराबाद संस्थान हे पराभवातून उभं राहिलेलं संस्थान आहे. असे मत व्यक्त केले. पुढे ते असेही बोलले की, १९११ला मीर उस्मान आली सत्तेवर आला. त्याने उर्दूमधून शिक्षण सुरु केले. स्वतःची नाणी तयार करून राज्य कारभार करण्यास सुरुवात केली. रजाकारांनी २२४ वर्ष अन्याय सुरु केला होता. हा अन्याय संपविण्यासाठीचा हा लढा होता. गोविंदभाई श्रॉफ, स्वामी रामानंद तीर्थ यांना हा लढा महत्त्वपूर्ण करायचा होता. असे मत व्यक्त केले.अध्यक्षीय समारोप प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांनी केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दिनेश कचकुरे यांनी केले. तर मान्यवरांचे आभार प्रोफेसर डॉ. विजय पांडे यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

## मुक्तिसंग्राम दिनानिमित्त रक्तदान शिबिर; ९८ जणांचे रक्तदान



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन आणि श्री गणेशोत्सवाचे औचित्य साधून 'क्लीन समता, ग्रीन समता' यांच्या वतीने नगरसेवक नाना घाटगे यांच्या संकल्पनेतून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला समतानगरसह शहरातील नागरिक तसेच महाविद्यालयीन तरुण-तरुणींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिबिरात ९८ जणांनी रक्तदान केले, तर ७४ जणांची बीपी व शुगर तपासणी करण्यात आली.रक्त संकलनाचे कार्य रेणुका ब्लड सेंटर, धाराशिव यांच्या वतीने करण्यात आले. यावेळी छत्रपती संभाजी महाराज उद्यानातील मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या लढ्यात शहीद झालेल्या वीरांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेल्या स्मृतिस्तंभास अभिवादन करण्यात आले.तसेच एमपीएससीसह विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींना स्पर्धा परीक्षेची पुस्तके वितरित करण्यात आली. रक्तदानासोबतच आरोग्य तपासणी आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप करून 'क्लीन समता, ग्रीन समता' उपक्रमाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपण्यासोबतच युवकांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना देण्याचा संदेश देण्यात आला.या उपक्रमास कैलास पानसे, रामचंद्र जोशी, टेकाळे, खिचडे, हरिदास लोमटे, बंटी कादरी, महेश काटे, मनसुर काझी, आकाश लश्करे, शैलेश काळे, बिभीषण माळी, रोहित घाटगे यांच्यासह नागरिक, विद्यार्थी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १८ सप्टेंबर २०२६


## मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन साजरा



**गुंजोटी (प्रा. नागसेन कांबळे) :** येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात आज ७९ वा मराठवाडा मुक्तिदिन साजरा करण्यात आला.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गुलाब राठोड,श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.दामोदरकाका पतंगे,संस्था उपाध्यक्ष मा.प्रभाकर तात्या हिरवे,प्रशासकीय अधिकारी अभयकुमार हिरास आदी उपस्थित होते.प्रारंभी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून संस्थेचे उपाध्यक्ष प्रभाकर तात्या हिरवे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.राष्ट्राचा अविभाज्य घटक असलेल्या मराठवाड्याला हैदराबाद संस्थानातील प्रजेला स्वातंत्र्यासाठी एक वर्षभर वाट पाहावी लागली. भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात ब्रिटिश साम्राज्या विरुद्ध लढा द्यावयाचा होता, परंतु हैदराबाद संस्थानात दोन आघाड्यावर लढावे लागत होते एक तर येथील मुक्ती संग्रामात विविधतेच्या साधनांनी लढा द्यावा लागत होता .असहकार सत्याग्रह भूमिगत चळवळी बरोबरच सशस्त्र लढायची विविध योजनांचा तेथील जनतेला अवलंब करावा लागला. हिप्परगा येथे जाऊन तिथे असलेल्या थोर स्वांतत्र्य सेनानी स्वामी रामानंद तीर्थ,बाबासाहेब परांजपे व अधिकारी विचारसरणी असलेल्या शिक्षकांशी संपर्क साधला गेला.स्वामी रामानंद तीर्थ यांचे एक सहकारी नरसिंह भातांब्रेकर यांना १९३४ साली अंबाजोगाईतील राष्ट्रीय विचारांचे शिक्षण देणाऱ्या योगेश्वरी विद्यालयात शिक्षक म्हणून पाठवले. या सर्व प्रक्रियेत अंबाजोगाई येथील प्रसिद्ध विधीज्ञ ऍड.भाऊसाहेब चौसाळकर यांचे मोलाचे योगदान होते. १९३४ नंतर स्वामी रामानंद तीर्थ, बाबासाहेब परांजपे यांचे सहकारी असलेली व राष्ट्रीय विचाराची बांधिलकी मानणारी देशभक्तांची तुकडी १९३५ साली अंबाजोगाईत येऊन दाखल झाली त्यात प्रामुख्याने आचार्य ग.धो.देशपांडे, रावसाहेब देशमुख,विसुभाऊ तावशीकर आदी शिक्षकांचा समावेश होता या सर्वांनी नव्याने शिक्षण क्षेत्रात काम करण्याची ठरविले .त्यांनी अंबाजोगाईतील सर्व प्रमुख व्यक्तींच्या गाठीभेटी घेऊन या संदर्भात विचार विनिमय सुरू केला त्यात डॉ.व्यंकटराव देशपांडे, चिंतामणराव कन्नडकर, जनार्दन देशपांडे (देसाई),रघुनाथराव नागापूरकर यांच्यासह यात अनेकांचा समावेश होता. ज्या काळात खादी टोपी वापरणे गुन्हा समजला जात असे याच कालखंडात स्वामी रामानंद तीर्थ आणि बाबासाहेब यांच्या सहवासात असलेले सर्व शिक्षक,नागरिक खादी पोशाख घालून रस्त्यावरून जात असत, तेव्हा निजामी सत्तेचे अधिकारी आणि समर्थक यांच्यात या प्रकाराने चल बिचल होत असे. स्वामी रामानंद तीर्थ व बाबासाहेब परांजपे यांनी विद्यार्थी वर्गावर स्वातंत्र चळवळीचे संस्कार केल्यामुळे एक आगळे वळण निर्माण झाले .स्वदेशीची चळवळ देशभर सुरू झाली त्याचे पडसाद अंबाजोगाई बरोबरच अनेक परिसरात पडले.गुंजोटीसारख्या गावातूनही अनेक क्रांतिकारक तयार झाले आणि या स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी स्वतःला झोकून दिले. असे सांगून प्रा. डॉ. आर. एन. निगडे यांनी यांनी मराठवाडा मुक्तीसंदर्भात अभ्यासपूर्ण विवेचन केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक , प्राध्यापकेतर सर्व कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. राष्ट्रगीतानंतर आभारप्रदर्शन होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

## मराठवाडा मुक्ती संग्रामच्या ७८ वर्षानंतर कृषी-औद्योगिक विकासाचे आव्हान स्वीकारणे ही काळाची गरजप्राचार्य डॉ. संजय अस्वले



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास केवळ हैदराबाद मुक्तीच्या अंतिम घटनेपुरता मर्यादित नसून, ग्रामीण भागातील सामान्य जनतेने केलेल्या संघर्षातून हा इतिहास घडला आहे. या स्थानिक योगदानाची नोंद आणि अभ्यास होणे आवश्यक आहे. तसेच ७८ वर्षां पुर्वी दिलेल्या या लढ्यानंतर मराठवाडा जनतेला स्वातंत्र्य मिळाले. पण जवळ जवळ साडेसात दशकांनंतर आज आपण शेती, उद्योग या क्षेत्रात क्रांती केली का? आर्थिक आणि सामाजिक, शैक्षणिक मागासलेपण दूर झाले का? यावर विचारमंथन आणि अभ्यास व संशोधन करण्यासाठी प्राध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी यानी पुढाकार घेणे हेच हुतात्म्यांना खरे अभिवादन आहे असे मत डॉ. प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी अध्यक्षीय समारोप प्रसंगी व्यक्त केले. येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सोमवंशी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले होते. प्रारंभी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त महाविद्यालयात प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. त्यानंतर डॉ. सोमवंशी यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या लढ्यात उमरगा तालुक्यातील, गुंजोटी, नाईचाकुर आणि उमरगा परिसरातील जनतेने पुढे येऊन धैर्याने सहभाग घेतला. रझाकारांच्या अत्याचाराला विरोध करत स्थानिक स्वातंत्र्यसैनिकांनी केलेला संघर्ष हा मराठवाड्याच्या मुक्तिसंग्रामाच्या इतिहासातील महत्त्वाचा अध्याय आहे, उमरगा व गुंजोटी परिसराचे मराठवाडा मुक्ती संग्रामातील योगदान सविस्तरपणे मांडले. निजामाच्या राजवटीत रझाकारांकडून होत असलेल्या अत्याचारांविरुद्ध स्थानिक पातळीवर झालेले प्रतिकार यावर सविस्तर मार्गदर्शन महाविद्यालयाचे इतिहास अभ्यासक डॉ. गिरीधर सोमवंशी यांनी केले. देवीसिंग चौहान आणि तात्याराव मोरे यांनी रझाकारांच्या अत्याचाराविरुद्ध उभे राहून केलेल्या संघर्षाचे विशेष महत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच नाईचाकूर येथील पोलिस चौकी लुटण्याच्या घटनेची दखल हैदराबादपर्यंत घेतली गेली होती. स्थानिक पातळीवरील अशा धाडसी घटनांमधून मराठवाडा मुक्ती संग्रामाची व्यापकता आणि जनतेचा संघर्ष स्पष्ट होतो, असे डॉ. सोमवंशी यांनी नमूद केले.कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. विनोद देवरकर, डॉ. पद्माकर पिटले, प्रा. जी. एस. मोरे, प्रा. शैलेश महामुनी, प्रभारी प्राध्यापक डॉ. सुभाष इंगळे, प्रा. दत्तात्रय लोभे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विनोद देवरकर यांनी केले तर उपप्राचार्य प्रा. जी. एस. मोरे यांनी आभार मानले.

## मराठवाडा मुक्ती संग्रामदिन उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** श्री व्यंकटेश पब्लिक स्कूल, भारतमाता नगर, बीड बायपास, छत्रपती संभाजीनगर येथे 17 सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्रामदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री दादासाहेब जाधव पाटील, कोषाध्यक्ष, श्री तिरुपती शिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर हे होते. त्यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. मराठवाडा रत्न मानकरी श्री राजीव भाऊ थिटे पाटील, समाजसेवक यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच श्री संतोष भाऊ हिवाळे पाटील, सामाजिक कार्यकर्ते यांच्या हस्ते सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, नृत्य, नाटक, गायन तसेच भाषणे सादर करून उपस्थितांची मने जिंकली. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास, स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान आणि देशभक्तीचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री सचिन घुले सर यांनी केले. सूत्रसंचालन श्री सचिन शिंदे सर यांनी केले, तर आभार श्री जानकीराम मनगटे सर यांनी मानले.याप्रसंगी शाळेचे ज्येष्ठ शिक्षक व इतिहासाचे गाढे अभ्यासक श्री संभाजी भोसले सर, मुख्याध्यापिका श्रीमती पुष्पा पवार, तसेच पडवाल सर, खैरे सर, जुंबडे सर, धनवे सर, गायकवाड सर, देशमुख सर, अनुराधा बोरुडे मॅडम, विजया दारुंटे मॅडम यांच्यासह कर्मचारी बोडखे पाटील व राजू बारसे मामा, विद्यार्थी, पालक व शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १८ सप्टेंबर २०२६


## १५ गावांची पाणीपुरवठा योजना १ ऑक्टोबरपूर्वी सुरू करा; अन्यथा २ ऑक्टोबरपासून उपोषणाचा इशारा



**उमरगा (प्रा.नागसेन कांबळे) :** तालुक्यातील कलदेव निंबाळा ग्रामसभेचा ठराव घेऊन पालकमंत्र्यांकडे सुनीता पावशेरे यांनी अंतिम मागणी केली आहे.कलदेव निंबाळा गावासह १५ गावांसाठी( 140 कोटी आसपास) कोट्यवधी रुपये खर्च करून पूर्ण करण्यात आलेली नवीन प्रादेशिक पाणीपुरवठा योजना केवळ वीज थकबाकीच्या कारणामुळे अद्याप बंद असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. ही योजना दि. १ ऑक्टोबर २०२६ पूर्वी तातडीने सुरू करावी, अन्यथा दि. २ ऑक्टोबर महात्मा गांधी जयंतीपासून धाराशिव येथे उपोषण आंदोलन सुरू करण्यात येईल, असा इशारा कलदेव निंबाळा ग्रामपंचायत गटनेत्या तथा महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा उपाध्यक्षा सौ. सुनीता देविदास पावशेरे यांनी पालकमंत्री ना. प्रताप सरनाईक यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे. मराठवाडा मुक्ती दिनानिमित्त धाराशिव येथे पालकमंत्र्यांना भेटून सुनिता पावशेरे यांनी या महत्त्वपूर्ण योजनेचे निवेदन देऊन चर्चा केली.कलदेव निंबाळा ग्रामसभेत दि. ४ सप्टेंबर २०२६ रोजी यासंदर्भात ठरावही मंजूर करण्यात आला आहे. ग्रामसभेत मांडलेल्या माहितीनुसार, योजनेचे काम पूर्ण होऊन बराच कालावधी झाला असून केवळ वीज बिल थकबाकीच्या कारणामुळे योजना सुरू झालेली नाही. कलदेव निंबाळा व अनेक गावांनी आपापली थकबाकी भरली असतानाही योजना अद्याप कार्यान्वित झालेली नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.दरम्यान, पावसाअभावी खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले असून विहिरी व बोअरवेल आटल्याने अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची गंभीर टंचाई निर्माण झाली आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांना पाण्यासाठी मोठी भटकंती करावी लागत असल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे."जनतेच्या जीवनावश्यक पाण्याचा प्रश्न गांभीर्याने घेऊन तातडीने निर्णय घ्यावा. १ ऑक्टोबरपूर्वी योजना सुरू करून दुष्काळी भागाला नियमित पाणीपुरवठा करावा; अन्यथा २ ऑक्टोबरपासून नागरिक, महिला, पदाधिकारी व लोकप्रतिनिधींच्या सहभागाने उपोषण आंदोलन सुरू केले जाईल," असा स्पष्ट इशारा सुनीता पावशेरे यांनी दिला आहे.पाणीप्रश्नावर आता आश्वासन नव्हे, प्रत्यक्ष निर्णयाची मागणीग्रामसभेचा ठराव, निवेदन आणि नागरिकांच्या स्वाक्षऱ्या प्रशासनाकडे यापूर्वीही सादर करण्यात आल्या असून, १ ऑक्टोबरची अंतिम मुदत प्रशासनासमोर ठेवण्यात आली आहे. त्यामुळे कलदेव निंबाळा व – १५ गावांची पाणी योजना प्रत्यक्षात कधी सुरू होते, याकडे दुष्काळी १६ गावांतील नागरिकांचे लक्ष लागले आहे. या ही योजना लवकरात लवकर सुरु करण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत असे आश्वासन यावेळी पालकमंत्र्यांनी दिले.

## उभ्या सोयाबीनवर रोटावेटर; कलदेव निंबाळयात शेतकऱ्यांची हतबलता



**कलदेव निंबाळा (नागसेन कांबळे) :** उमरगा तालुक्यात पावसाने पाठ फिरवल्याने हातातोंडाशी आलेले सोयाबीन पीक डोळ्यादेखत वाळत असल्याने कलदेव निंबाळा येथील शेतकऱ्यांची हतबलता टोकाला पोहोचली आहे. नुकसान झालेल्या उभ्या सोयाबीन पिकावर काही शेतकऱ्यांनी चक्क रोटावेटर व नांगर फिरवण्यास सुरुवात केली आहे.गुंडू शंकर बिराजदार यांच्यासह शिवारातील अनेक शेतकऱ्यांनी पिकाची परिस्थिती पाहून नाईलाजाने सोयाबीन जमीनदोस्त केले. दुसरीकडे चाऱ्याची टंचाई निर्माण झाल्याने काही शेतकरी सोयाबीनच्या शेतात जनावरे सोडून चाऱ्याची गरज भागवत आहेत. मात्र फवारणी केलेले व सुकलेले सोयाबीन जनावरेही अपेक्षित प्रमाणात खात नसल्याने शेतकरी आणि पशुधन दोघांसमोरही गंभीर संकट निर्माण झाले आहे."शेतकऱ्यांची परिस्थिती 'इकडे आड, तिकडे विहीर' अशी झाली आहे. सर्व शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्यांसह नुकसानभरपाईसाठी तहसीलदारांना निवेदन देण्यात आले आहे. आता प्रशासनाने केवळ पंचनामे आणि कागदोपत्री कार्यवाही न करता प्रत्यक्ष नुकसान लक्षात घेऊन शासनाकडून तातडीने नुकसानभरपाई मिळवून द्यावी," अशी मागणी ग्रामपंचायत गटनेत्या सुनिता देविदास पावशेरे यांनी केली आहे.

## मध्य रेल्वेकडून पुणे आणि बीड दरम्यान नवीन दैनंदिन एक्सप्रेस रेल्वे सेवा सुरू

**बीड - भगवंत पाळवदे :** प्रवाशांच्या दीर्घकाळापासून असलेल्या मागणीची पूर्तता करण्यासाठी तसेच या भागातील रेल्वे कनेक्टिव्हिटी अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने, रेल्वे बोर्डाने पुणे आणि बीड दरम्यान नवीन नियमित दैनंदिन एक्सप्रेस रेल्वे सेवा सुरू करण्यास मंजुरी दिली आहे.नवीन सुरू करण्यात येणाऱ्या रेल्वे सेवेचा तपशील आणि वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे:गाडी क्रमांक 11433 / 11434 पुणे – बीड – पुणे एक्सप्रेस (दैनंदिन)गाडी क्रमांक 11433 पुणे – बीड एक्सप्रेस (दैनंदिन) ची नियमित सेवा 22.09.2026 (मंगळवार) पासून सुरू होईल. ही गाडी दररोज पुणे येथून 22:45 वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी 06:00 वाजता बीड येथे पोहोचेल.गाडी क्रमांक 11434 बीड – पुणे एक्सप्रेस (दैनंदिन) ची नियमित सेवा 23.09.2026 (बुधवार) पासून सुरू होईल. ही गाडी दररोज बीड येथून 21:30 वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी 05:20 वाजता पुणे येथे पोहोचेल.अंतर आणि प्रवासाचा कालावधी: ही गाडी एकूण 326 किलोमीटरचे अंतर कापेल. पुणे ते बीड प्रवासाचा कालावधी 07 तास 15 मिनिटे, तर बीड ते पुणे परतीच्या प्रवासाचा कालावधी 07 तास 50 मिनिटे असेल.डब्यांची संरचना: ही गाडी आधुनिक 15 एलएचबी डब्यांच्या संरचनेसह चालविण्यात येईल. यामध्ये 01 एसी 2-टियर (LWACCW), 02 एसी 3-टियर (LWACCN), 06 स्लीपर क्लास (LWSCN), 04 जनरल सेकंड क्लास (LWS), 01 सेकंड क्लास लगेज/ब्रेक व्हॅन (LSLRD) आणि 01 जनरेटर कार (LWLRRM) यांचा समावेश आहे.थांबे: उरुळी, दौंड कॉर्ड लाईन, श्रीगोंदा रोड, अहिल्यानगर, नारायणडोह, न्यू आष्टी आणि अमळनेर भंड्याचे.आरक्षण आणि तिकीट बुकिंगची माहितीनव्याने सुरू करण्यात येणाऱ्या नियमित गाडी क्रमांक 11433 आणि 11434 चे आरक्षण 20.09.2026 पासून सर्व संगणकीकृत पीआरएस तिकीट केंद्रांवर तसेच आयआरसीटीसीच्या वेबसाइटवर (www.irctc.co.in) सुरू होईल.इतर गाड्यांच्या वेळेत बदलनवीन दैनंदिन सेवा सुरू करण्यात आल्याने परिचालनाच्या दृष्टीने खालील बदल करण्यात आले आहेत. प्रवाशांनी याची कृपया नोंद घ्यावी:गाडी क्रमांक 11405 पुणे – अमरावती एक्सप्रेस: 25.09.2026 पासून ही गाडी पुणे येथून 22:55 वाजता सुटेल. यापूर्वी तिची पुणे येथून सुटण्याची वेळ 22:45 वाजता होती. दौंड येथे ही गाडी 00:28/00:30 वाजता थांबेल. यापूर्वी दौंड येथील थांब्याची वेळ 00:10/00:12 वाजता होती. इतर स्थानकांच्या विद्यमान वेळेत कोणताही बदल करण्यात आलेला नाही.गाडी क्रमांक 11417 पुणे – सोलापूर एक्सप्रेस: 22.09.2026 पासून ही गाडी पुणे येथून 23:05 वाजता सुटेल. यापूर्वी तिची पुणे येथून सुटण्याची वेळ 23:00 वाजता होती. दौंड येथे ही गाडी 01:25/01:30 वाजता थांबेल. यापूर्वी दौंड येथील थांब्याची वेळ 00:55/01:00 वाजता होती. इतर स्थानकांच्या विद्यमान वेळेत कोणताही बदल करण्यात आलेला नाही.गाडी क्रमांक 16381 पुणे – कन्याकुमारी एक्सप्रेस: 22.09.2026 पासून ही गाडी सुधारित वेळापत्रकानुसार धावेल. ही गाडी पुणे येथून पूर्वीच्या 23:45 वाजताच्या वेळेऐवजी सुधारित वेळेनुसार 23:20 वाजता सुटेल. ही गाडी दौंड येथे 00:20/00:25 वाजता, कुर्डुवाडी येथे 02:03/02:05 वाजता आणि सोलापूर येथे 03:20/03:25 वाजता थांबेल.प्रवाशांनी प्रवास सुरू करण्यापूर्वी मार्गावरील सर्व स्थानकांवरील गाडीच्या अचूक आगमन व प्रस्थानाच्या वेळांची माहिती भारतीय रेल्वेच्या चौकशी पोर्टल www.enquiry.indianrail.gov.in वर किंवा अधिकृत NTES ॲप डाउनलोड करून तपासून घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

## पेरियार जयंती, भैय्यासाहेब आंबेडकर स्मृतिदिन व मुक्ती संग्राम दिन साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** सिडको एन-7 येथील मातोश्री रमाबाई आंबेडकर हायस्कूलमध्ये मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मराठवाड्याच्या मुक्तीसाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या सर्व ज्ञात-अज्ञात हुतात्म्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाच्या निमित्ताने समाजसुधारक रामासामी पेरियार यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या सामाजिक समता, स्वाभिमान आणि तर्कवादी विचारांना अभिवादन करण्यात आले. तसेच सूर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर तथा यशवंत आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या सामाजिक कार्याला आणि योगदानाला आदरांजली अर्पण करण्यात आली.यावेळी विद्यार्थ्यांना मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास, हुतात्म्यांचे बलिदान तसेच महापुरुषांच्या सामाजिक विचारांची माहिती देण्यात आली. स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय आणि वैज्ञानिक दृष्टिकोन ही मूल्ये विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात अंगीकारावीत, असा संदेश यावेळी देण्यात आला.कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक श्री सी एस चव्हाण, शिक्षकवृंद श्री एस आर चव्हाण, श्री बी के गडहिरे शिक्षकेतर कर्मचारी श्री एस जे पांडे, श्री डी व्ही म्हस्के, श्री एस आर देहरे आणि विद्यार्थी उपस्थित होते. या वेळी महापुरुषांच्या विचारांचे स्मरण करून त्यांचे कार्य पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प करण्यात आला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १८ सप्टेंबर २०२६


## भारतरत्न राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालयात ७८ वा मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा



**बिल्डा :** भारतरत्न राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालय बिल्डा येथे ७८ वा मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा करण्यात आला आज दिनांक १७ सप्टेंबर २०२६ रोज गुरुवार सकाळी ठिक ७:१५ वाजता मराठवाडा मुक्ती संग्राम दिना निमित्त महाविद्यालयाच्या इमारतीवर ध्वजारोहण प्राचार्य संतोष पुंडगे सर यांच्या शुभ हस्ते करण्यात आले यावेळी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी आणी गावातील पालक व जेष्ठ प्रतिष्ठीत नागरीक उपस्थितीत होते.... या प्रसंगी श्री.फयाज शाहा , सुदाम भाऊ मते,सोमीनाथ मते ,आकाश गायकवाड, नाना बोरसे , लतीफ शाहा ,साहेबराव मुळे, विठ्ठल साहेबराव गायकवाड इत्यादी .....!!!!

## सुशीलादेवी देशमुख विद्यालयात श्री. चेतन माने यांच्या हस्ते ध्वजारोहण



**छ. संभाजीनगर :** येथील सुशीलादेवी देशमुख विद्यालयात संस्थेचे सचिव श्री. चेतन माने यांच्या हस्ते मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे ध्वजारोहण करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष श्री. निखिल माने यांची उपस्थिती होती. तर अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. बी. जे. पहिलवान हे होते. तसेच प्रा. विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती उर्मिला थेटे व श्री. आर. पी. चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी श्री. चेतन माने यांनी बोलतांना विद्यार्थ्यांनी मराठवाडा आणि देशाच्या विकासात योगदान द्यावे असे आवाहन केले. तर श्री. आर. पी. चव्हाण यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास सांगितला. शेवटी श्री. बी.जे. पहिलवान यांनी अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती एम. व्ही. देसले यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. रमाकांत छडीदार यांनी केले. या कार्यक्रमासाठी दोन्ही विभागाचे विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संकल्प विद्या मंदिरात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा



**अंबाजोगाई (भगवंत पाळवदे) :** संकल्प विद्या मंदिर येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन अत्यंत उत्साही व देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती रेखा बडे-चोले यांच्या शुभहस्ते सन्मानपूर्वक ध्वजारोहण संपन्न झाले.ध्वजारोहण सोहळयानंतर आयोजित कार्यक्रमात शाळेच्या इतिहास विषयाच्या शिक्षिका श्रीमती परदेशी मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मराठवाडा मुक्ती संग्रामाचा दैदिप्यमान इतिहास, हुतात्म्यांचे बलिदान आणि या लढ्याचे महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे मराठवाडा मुक्ती संग्राम दिनासोबतच शाळेतील 'संकल्प सिद्धी गणेशाची' भव्य आरतीही पार पडली. या दुहेरी औचित्यामुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. या संपूर्ण सोहळयाला शाळेच्या सर्व 'स्कूल बस व व्हॅन'चे चालक-मालक, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या उपस्थितीमुळे हा कार्यक्रम अत्यंत आनंदात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला

## मनपा शाळेत मराठवाडा मुक्ती संग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा. प्रा व मा विध्यालय चिकलठाणा. शाळेत मराठवाडा मुक्ती संग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. .श्री.मारोती काका धोत्रे यांच्या हस्ते ध्वजस्तंभाचे पुजन करून श्रीफळ अर्पण करून,शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष श्री. मनोहर मामा लोंढे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.सूत्रसंचालन , आजच्या कार्यक्रमासाठी प्रभागाच्या सन्मानीय नगरसेविका वैशालीताई कोरडे ,शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष श्री.मनोहर मामा लोंढे,श्री कैलास रिठे ,शा.व्यवस्थापन समिती सदस्य श्री.मारोतीकाका धोत्रे, सुनिल सदगीर, श्री.संजीव डोळस,श्रीमती अश्विनीताई डांगे सोसायटीचे चेअरमन श्री.साईनाथ दहिहंडे, श्री.सोमिनाथ बोचरे उपस्थित होते.श्री.मारोती काका धोत्रे ,सुनिल सदगीर, ,संजीव डोळस या मान्यवरांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिना संबधी विचार विद्यार्थ्यांसमोर मांडले ,श्रीमती.संगीता चव्हाण मॅडम सूत्रसंचालन केले, मुख्याध्यापक वसंत राठोड यांच्या मार्गदर्शन खाली श्री वाघसर श्रीम.बेबी राऊत श्रीम.तारो मॅडम , अर्चना भारव्दाज मॅडम,मनिषा शिंदे ,भिंगोले मॅडम,फुलंब्रीकर मॅडम, श्री.संदिप चव्हाण सर,श्री.पठाण सर,,श्री.सुर्यवंशी सर, शिपाई सुरेश वाघ,श्रीम.सुनिता साबळे,श्रीम.सुजाता भोसले यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परीश्रम घेतले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १८ सप्टेंबर २०२६


## एकुरगा येथे गणेश उत्सव व मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त विजय सगर यांचे प्रबोधनपर व्याख्यान संपन्न!



**उमरगा (प्रा.नागसेन कांबळे) :** तालुक्यातील श्री. शिवशक्ती विद्यालय, एकुरगा येथे गणेश उत्सव व मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून विद्यालयाच्या वतीने एका विशेष प्रबोधनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. 'स्पर्धा परीक्षा व खेळाचे शालेय जीवनातील महत्त्व' या अत्यंत समर्पक विषयावर सुप्रसिद्ध वक्ता श्री. विजय सगर यांनी विद्यार्थ्यांना अतिशय सखोल, ओघवत्या आणि प्रेरणादायी भाषेत मार्गदर्शन केले. त्यांच्या या मार्गदर्शनाने विद्यार्थ्यांमध्ये एक नवीन ऊर्जा निर्माण केली.समारंभ व मान्यवरांचा परिचय:कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानविकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. प्रकाश बोंडगे सर हे होते. मंचावर विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. अजित साळुंके सर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाल्यानंतर, ज्ञानविकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. प्रकाश बोंडगे यांच्या हस्ते प्रमुख वक्ता श्री. विजय सगर यांचा पुष्पगुच्छ, शॉल श्रीफळ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. अजित साळुंके सर यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये कार्यक्रमाची भूमिका स्पष्ट केली, तर श्रीमती विजया गायकवाड यांनी अत्यंत सुंदर असे सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण मा. प्रकाश बोंडगे सर यांनी केले. या ऐतिहासिक व ज्ञानवर्धक प्रसंगी श्री. धनराज पाटील, श्री. राजेंद्र सगर, श्री. सिद्धेश्वर वाकडे, श्री. महादेव करके, श्री. म्हाळाप्पा कोकरे, श्री. सोमनाथ म्हेत्रे, श्री. राहुल बोंडगे यांच्यासह विद्यालयातील इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.श्री. विजय सगर यांचे विस्तृत मार्गदर्शन व मुख्य मुद्दे:कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरलेल्या श्री. विजय सगर यांनी आपल्या व्याख्यानात खालील मुद्द्यांवर विशेष भर दिला:स्पर्धा परीक्षा व खेळांमुळे विद्यार्थ्यांमधील गुणांचा विकास:विजय सगर यांनी बोलताना सांगितले की, स्पर्धा परीक्षा व खेळ यांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वात अमुकुल बदल होतो. यामुळे विद्यार्थ्यांत निर्णय क्षमता (Decision Making), आत्मविश्वास, संयम, स्पर्धा परीक्षांची आवड, मानसिक व शारीरिक विकास, अपयश पचवणे, संकटाला धैर्याने सामोरे जाणे आणि कोणत्याही संकल्पना स्पष्ट होणे अशा विविध गुणांचा कसा उत्तम विकास होतो, हे त्यांनी अत्यंत मनोरंजक पद्धतीने ज्वलंत उदाहरणे देऊन स्पष्ट केले.ध्येयनिश्चिती आणि गरुड भरारी:विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी आवर्जून सांगितले की, "जर तुम्हाला यशाची गरुड भरारी घ्यायची असेल, तर तुमचे ध्येय आतापासूनच निश्चित करा आणि त्यासाठी आजच दृढ निश्चय करा."मैदानी खेळ व तंत्रज्ञानाचा योग्य वापर:आजच्या पिढीने मोबाईल आणि तंत्रज्ञानाचा अतिवापर टाळून फक्त गरजेपुरताच व योग्य तेवढाच वापर केला पाहिजे. तसेच शरीर व मन निरोगी ठेवण्यासाठी मैदानी खेळ खेळणे किती गरजेचे आहे, हे त्यांनी पटवून दिले.सकारात्मक मानसिकता:मनातील सर्व प्रकारच्या नकारात्मक भावना पूर्णपणे बाजूला सारून विद्यार्थ्यांनी नेहमी सकारात्मक विचार (Positive Thinking) केला पाहिजे, हे त्यांनी एका सुंदर कथेच्या माध्यमातून अगदी सोप्या भाषेत समजून सांगितले.विविध स्पर्धा परीक्षांची सखोल माहिती:विद्यालयातील विद्यार्थ्यांना शालेय वयापासूनच स्पर्धा परीक्षांची गोडी लागावी यासाठी त्यांनी MTS, NTS, NMMS, नवोदय व स्कॉलरशिप अशा विविध स्पर्धा परीक्षा नेमक्या कशा असतात आणि त्यांची तयारी कशी करावी याचे अत्यंत सखोल मार्गदर्शन केले.छत्रपती शिवाजी महाराज यांचे व्यवस्थापन आणि जीवनमूल्ये:व्याख्यानाच्या शेवटी, विद्यार्थ्यांना यश मिळाल्यानंतर समाजात मिळणारा मान-सन्मान यावर बोलताना त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे उत्तम मॅनेजमेंट (व्यवस्थापन कौशल्य) कसे होते, याचे उत्तम दाखले दिले. विद्यार्थ्यांनी आयुष्यात 'नेमके काय केले पाहिजे?' आणि 'काय करू नये?' याबाबत मार्गदर्शन करताना शिक्षक व पालक यांची विद्यार्थ्यांच्या जडणघडणीतील भूमिका स्पष्ट केली.काव्य, विनोद आणि चारोळ्यांचा संगम:श्री. विजय सगर यांनी आपल्या संपूर्ण व्याख्यानात केवळ पुस्तकी ज्ञान न देता; ज्वलंत उदाहरणे, प्रेरित करणाऱ्या चारोळ्या, काव्य आणि विनोदी कथा यांचा सुरेख संगम घडवून आणला. यामुळे मुले शेवटपर्यंत खिळवून राहिली आणि त्यांनी या मार्गदर्शनाचा पुरेपूर आनंद घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी वक्त्यांच्या या उत्कृष्ट मार्गदर्शनाबद्दल विशेष कौतुक व आभार व्यक्त केले.

## बलसुर येथे मराठवाडा मुक्तिसंग्राम साजरा



**बलसुर (प्रा.नागसेन कांबळे) :** उमरगा तालुक्यातील बलसूर येथील श्री.छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व भाऊसाहेब बिराजदार वरिष्ठ महाविद्यालयात आणि श्री.छत्रपती शिवाजी इंग्लिश स्कूल येथे गुरुवारी (ता.17) रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त ध्वजारोहण माजी सैनिक इंद्रजित घोडके यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सतीश वाकडे होते. याप्रसंगी संस्थेचे कोषाध्यक्ष दत्तात्रय (काका) बिराजदार, प्राचार्य पी.टी.कांबळे, सेवानिवृत्त शिक्षक बळीराम नांगरे आदींची उपस्थिती होती. सतीश कांबळे यांचे भाषण झाले. सूत्रसंचालन प्रा.परमेश्वर सूर्यवंशी यांनी केले तर आभार प्रा. बी.टी.जाधव यांनी मांडले. यावेळी प्राध्यापक , शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.मरगा तालुक्यातील बलसूर येथील श्री.छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व भाऊसाहेब बिराजदार वरिष्ठ महाविद्यालयात आणि श्री.छत्रपती शिवाजी इंग्लिश स्कूल येथे गुरुवारी (ता.17) रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त ध्वजारोहण माजी सैनिक इंद्रजित घोडके यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सतीश वाकडे होते. याप्रसंगी संस्थेचे कोषाध्यक्ष दत्तात्रय (काका) बिराजदार, प्राचार्य पी.टी.कांबळे, सेवानिवृत्त शिक्षक बळीराम नांगरे आदींची उपस्थिती होती. सतीश कांबळे यांचे भाषण झाले. सूत्रसंचालन प्रा.परमेश्वर सूर्यवंशी यांनी केले तर आभार प्रा. बी.टी.जाधव यांनी मांडले. यावेळी प्राध्यापक , शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मराठवाड्याला सहानुभूती नव्हे, संधीची गरज: प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** मराठवाड्याकडे केवळ समस्यांचा प्रदेश म्हणून न पाहता समृद्ध वारसा, ज्ञान आणि उद्योगाच्या बळावर विकासाचे नवे पर्व उभे केले पाहिजे. या भूमीला सहानुभूतीची नाही, तर संधींची गरज आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी केले. येथील जेईएस महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्या वतीने आयोजित 'मराठवाडा: आज आणि उद्याची अर्थव्यवस्था' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते.पुढे बोलताना प्राचार्य डॉ. अग्निहोत्री म्हणाले की, दोन हजार वर्षांपूर्वी मराठवाड्यातील भोकरदन जागतिक रोमन व्यापाराशी जोडलेले होते. त्यामुळे आजचा मराठवाडाही जागतिक अर्थव्यवस्थेत नक्कीच स्वतःचे स्थान निर्माण करू शकतो. अजिंठा, वेरूळ, पैठण यांसारख्या ऐतिहासिक वारशातून 'हेरिटेज इकॉनॉमी' उभी राहू शकते. पर्यटनासोबत स्थानिक हस्तकला, खाद्यसंस्कृती आणि लोककलांची सांगड घातल्यास ग्रामीण भागात रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होतील. महाविद्यालयांनी केवळ पदव्या न वाटता स्थानिक समस्यांवर तोडगा काढणारी संशोधन केंद्रे बनावे, असे सांगत त्यांनी 'माती, स्मृती, ज्ञान, कौशल्य, उद्योग, रोजगार आणि समृद्धी' हे विकासाचे सप्तसूत्री मांडले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विलास जाधव यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. यास्मिन शेख यांनी केले, तर आभार बाबू तोटरे यांनी मानले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. उमेश मोगले, उपप्राचार्य डॉ. सुमंत बिक्कड, पर्यवेक्षक प्रा. डी. एम. धनवे , डॉ. फुलचंद मोहिते यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी - विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १८ सप्टेंबर २०२६


## ७८ वर्षांनंतरही कृषी-औद्योगिक विकासाचे आव्हान कायम



**उमरगा :** मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास केवळ हैदराबाद मुक्तीच्या अंतिम घटनेपुरता मर्यादित नसून, ग्रामीण भागातील सामान्य जनतेने केलेल्या संघर्षातून हा इतिहास घडला आहे. या स्थानिक योगदानाची नोंद आणि अभ्यास होणे आवश्यक आहे. तसेच 78 वर्षां पुर्वी दिलेल्या या लढ्यानंतर मराठवाडा जनतेला स्वातंत्र्य मिळाले. पण जवळ जवळ साडेसात दशकांनंतर आज आपण शेती, उद्योग या क्षेत्रात क्रांती केली का? आर्थिक आणि सामाजिक, शैक्षणिक मागासलेपण दूर झाले का? यावर विचारमंथन आणि अभ्यास व संशोधन करण्यासाठी प्राध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी यांनी पुढाकार घेणे हेच हुतात्म्यांना खरे अभिवादन आहे असे मत डॉ. प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी अध्यक्षीय समारोप प्रसंगी व्यक्त केले. येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सोमवंशी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले होते. प्रारंभी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त महाविद्यालयात प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. त्यानंतर डॉ. सोमवंशी यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या लढ्यात उमरगा तालुक्यातील, गुंजोटी, नाईचाकुर आणि उमरगा परिसरातील जनतेने पुढे येऊन धैर्याने सहभाग घेतला. रझाकारांच्या अत्याचाराला विरोध करत स्थानिक स्वातंत्र्यसैनिकांनी केलेला संघर्ष हा मराठवाड्याच्या मुक्तिसंग्रामाच्या इतिहासातील महत्त्वाचा अध्याय आहे, उमरगा व गुंजोटी परिसराचे मराठवाडा मुक्ती संग्रामातील योगदान सविस्तरपणे मांडले. निजामाच्या राजवटीत रझाकारांकडून होत असलेल्या अत्याचारांविरुद्ध स्थानिक पातळीवर झालेले प्रतिकार यावर सविस्तर मार्गदर्शन महाविद्यालयाचे इतिहास अभ्यासक डॉ. गिरीधर सोमवंशी यांनी केले. देवीसिंग चौहान आणि तात्याराव मोरे यांनी रझाकारांच्या अत्याचाराविरुद्ध उभे राहून केलेल्या संघर्षाचे विशेष महत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच नाईचाकूर येथील पोलिस चौकी लुटण्याच्या घटनेची दखल हैदराबादपर्यंत घेतली गेली होती. स्थानिक पातळीवरील अशा धाडसी घटनांमधून मराठवाडा मुक्ती संग्रामाची व्यापकता आणि जनतेचा संघर्ष स्पष्ट होतो, असे डॉ. सोमवंशी यांनी नमूद केले.कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. विनोद देवरकर, डॉ. पद्माकर पिटले, प्रा. जी. एस. मोरे, प्रा. शैलेश महामुनी, प्रभारी प्राध्यापक डॉ. सुभाष इंगळे, प्रा. दत्तात्रय लोभे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विनोद देवरकर यांनी केले तर उपप्राचार्य प्रा. जी. एस. मोरे यांनी आभार मानले.

## कालिकादेवी विद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा



**शिरूर कासार :** कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात,'मराठवाडा मुक्ती संग्राम दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या हस्ते 'स्वामी रामानंद तीर्थ व सरदार वल्लभभाई पटेल' यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून राष्ट्रीय तिरंगा ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले,व सामूहिक राष्ट्रगीत तसेच वंदे मातरम् आणि महाराष्ट्र राज्यगीत घेण्यात आले.यावेळी शिरूर कासार नगरपंचायतचे नगराध्यक्ष मा.रोहिदास पाटील गाडेकर, शिरूर (कासार) व्यापारी संघटनेचे अध्यक्ष मा.बबनराव (तात्या) ढाकणे, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे, ज्येष्ठ नगरसेवक मा.दादासाहेब हरिदास माजी सरपंच मा.आनंदजी जावळे नगरसेवक मा.गणेशजी तळेकर मुख्याध्यापक अनिल पाटील गाडेकर, सभापतीचे प्रतिनिधी श्री अक्षय रणखांब, उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने, उपमुख्याध्यापक सिद्धेश्वर शिंदे, पर्यवेक्षक जनार्दन काळे, प्रा.संजय काकडे, प्रा.नामदेव तरकसे, प्रा.महारुद्र डोंगरे, प्रा.अशोक इनकर, प्रा.प्रशांत मळेकर, प्रा.संजय आव्हाड, प्रा.बिभीषण घायाळ, प्रा.विश्वास ढाकणे,प्रा.महादेव हंगे प्रा.नारायण तांबे, प्रा.रवींद्र संकपाळे, प्रा.सुनील मोरे, प्रा.दत्ता गायकवाड, प्रा.नारायण घोलप, प्रा.घनश्याम चव्हाण, प्रा.लक्ष्मण गव्हाणे, प्रा.अशोक सवासे, प्रा.शशिकांत जावळे, प्रा.हनुमंत घायाळ, प्रा.बाळासाहेब खटाणे, प्रा.सविता दराडे, प्रा.रेखा निर्मळ सौ.अनिता लाटे, आप्पासाहेब कांबळे, विनायक सुरवसे, संतोष चौधरी,राजू बडे, जयेंद्र निकम, रवी जोशी, नितीन बहिर, रवींद्र गव्हाणे, सुंदर शिंदे, आदिनाथ काशीद, सुनील खेडकर, नंदकुमार जाधव, विलास कांबळे, गौतम भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.आत्माराम झिंजुर्डे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.विनोद गलांडे यांनी केले यावेळी विद्यालयातील सर्व कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या उपस्थित होते.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903


## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन साजरा



**जालना :** बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण नाफडे यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. प्रारंभी वंदे मातरम, राज्यगीत, राष्ट्रगीत झाल्यानंतर मानसी काळे या विद्यार्थिनीने मराठवाडा मुक्ती संग्राम दिनासंदर्भात आपले विचार व्यक्त केले. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा विभाग प्रमुख बी.बी. सले, डॉ. कुणाल देशपांडे यांनी केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १८ सप्टेंबर २०२६


## तेरणा हायस्कूलमध्ये मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा



**तेरणा :** तेरणा येथील तेरणा हायस्कूलमध्ये 17 सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या सुरुवातीला मराठवाडा मुक्ती संग्रामातील हुतात्म्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी केशवराव मुंडे यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्याच्या इतिहासाविषयी माहिती दिली.याप्रसंगी मुख्याध्यापक के.पी. पवार म्हणाले, मराठवाड्याला निजामाच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी बलिदान दिले. आजच्या पिढीने त्यांच्या त्यागातून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. रमेश प्रधान यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले, तर माधुरी काटकर यांनी सूत्रसंचालन केले.यावेळी व्यासपीठावर प्रदिप भाले, रमेश जोशी, मिनाक्षी चौधरी,छाया पाटील,भाग्यश्री काळे, उषा उदगे, दिपाली चांडे, पाटील मॅडम,सिंधु बोर्डे यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माजी विद्यार्थी संघाकडून रामनगर शाळेला साहित्य भेट




**कन्नड (अरुण थोरात) :** मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून जि. प. प्राथमिक शाळा रामनगर, गुदमा, केंद्र चापानेर, ता. कन्नड, येथे माजी विद्यार्थी संघाच्या वतीने शाळेला विविध साहित्य भेट देण्यात आले.माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष कार्तिक विजय जाधव, उपाध्यक्ष केतन राठोड तसेच अनिल राठोड, चेतन राठोड, सचिन राठोड, ज्ञानेश्वर चव्हाण, विनोद जाधव व इतर सदस्यांनी मिळून शाळेसाठी दोन पंखे, सहा खुर्च्या, दोन चटया व दोन फोटो भेट दिले.या साहित्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेतील विविध शैक्षणिक व इतर उपक्रमांसाठी सुविधा उपलब्ध होणार आहेत. माजी विद्यार्थी संघाने शाळेच्या विकासासाठी केलेल्या या सहकार्याबद्दल शाळेतर्फे कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री लाडे, शिक्षक श्री निमसे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रामेश्वर राठोड व उपाध्यक्ष काजल राहुल राठोड यांनी शाळेतर्फे माजी विद्यार्थी संघाचे मनःपूर्वक आभार मानले.माजी विद्यार्थ्यांनी शाळेशी असलेले नाते जपत केलेल्या या सहकार्याचे पालक व ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.

## दरेगाव दरी येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा




**फुलंब्री :** तालुक्यातील दरेगाव दरी येथील एस.पी.स्कुल अँड ज्युनिअर कॉलेज येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे ध्वजारोहण माजी ग्रामपंचायत सदस्य विठ्ठल दुधे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तंटामुक्ती अध्यक्ष नाना पाटील मालोदे होते.या वेळी सरपंच गुणाजी पाटील मालोदे, ग्रा.पं. सदस्य गोपीनाथ मालोदे, दिनकर पाटील मालोदे, विठ्ठल हनुमंत मालोदे, विश्वराम मालोदे, विठ्ठल महादू मालोदे, हरी काका मालोदे, आनंद पाटील मालोदे, विनोद भाऊ मालोदे यांच्यासह शाळेतील शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.


## वसुधैव कुटुंबकम् हाच आंतरराष्ट्रीय लोकशाही मूल्यांचा पाया

**नाशिक :** जगभर साजऱ्या होणाऱ्या आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनानिमित्त यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापी ठाच्या यशवाणी वेब रेडिओवर 'आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन परिचय' या विषयावर ज्ञानसत्राचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनातर्फे आयोजित हे 24 वे ज्ञानसत्र दि. 17 सप्टेंबर 2026 रोजी संपन्न झाले. परिसंवादातील तज्ज्ञांनी 'वसुधैव कुटुंबकम्' ही संकल्पना आंतरराष्ट्रीय लोकशाही मूल्यांचा महत्त्वपूर्ण पाया असल्याचे प्रतिपादन केले. विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या संकल्पनेतून आणि प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या कल्पक मार्गदर्शक सूचनेनुसार या ज्ञानसत्राचे आयोजन करण्यात आले. महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनाचे प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी ज्ञानसत्राचे समन्वयन, सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन केले.परिसंवादात लोकशाहीची जागतिक संकल्पना, दक्षिण आशियातील लोकशाहीची वाटचाल, विविधता, नागरिकांचा सहभाग, विरोधी पक्षांची भूमिका तसेच लोकशाहीसमोरील समकालीन आव्हाने यांवर चर्चा करण्यात आली. लोकशाही ही केवळ निवडणूक प्रक्रिया नसून समानता, स्वातंत्र्य, सामाजिक न्याय, संवाद, सहअस्तित्व आणि नागरिकांच्या सक्रिय सहभागावर आधारित व्यापक व्यवस्था असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. प्रथम परिसंवादक डॉ. राजेंद्र बगाटे यांनी 'लोकशाहीची दक्षिण आशियाई जडणघडण : सार्क देशांची वाटचाल, विविधता आणि आव्हाने तसेच विरोधी पक्षांची भूमिका' या विषयावर विचार मांडले. दक्षिण आशियातील विविध देशांतील लोकशाही संस्थांची वाटचाल, सामाजिक-सांस्कृतिक विविधता, नागरिकांचा सहभाग आणि विरोधी पक्षांचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. द्वितीय परिसंवादक प्रा. सुजाता मोरे यांनी 'भारतीय लोकशाही आणि नागरिकांची उदासीनता' या विषयावर सविस्तर विवेचन केले. लोकशाही प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग, सार्वजनिक प्रश्नांविषयीची जागरूकता आणि नागरिकांच्या जबाबदाऱ्यांचे महत्त्व त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले. पर्यटनशास्त्रीय दृष्टिकोनातून सामाजिक सहभागाच्या विविध पैलूंवरही त्यांनी प्रकाश टाकला. तिसरे परिसंवादक प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी 'अमेरिकन व भारतीय लोकशाहीचा तुलनात्मक आढावा' घेताना दोन्ही देशांच्या लोकशाही व्यवस्थांची वैशिष्ट्ये आणि संस्थात्मक रचनेचे विवेचन केले. यानंतर त्यांनी 'पालक लोकशाहीचे' हे समयोचित काव्य सादर केले. या ज्ञानसत्राचा लाभ अध्ययनार्थी, शिक्षक, संशोधक आणि नागरिकांना घेता यावा, यासाठी कार्यक्रम विद्यापीठाच्या https://avc.ycmou.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. विद्यापीठाच्या दृक्श्राव्य केंद्राचे प्रमुख श्री. धनंजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तंत्रसहाय्यक श्री. प्रकाश सापनर व श्री. गिरीश गवळी यांनी तांत्रिक सहकार्य केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. दीपक राजगिरे यांनी विशेष परिश्रम घेतले. या ज्ञानसत्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यासनप्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १८ सप्टेंबर २०२६


## आगळा वेगळा सन्मान : ज्या शाळेत शिकलो त्याच शाळेत ध्वजारोहण!



जीवनाच्या प्रवासात माणसाला अनेक टप्पे पार करावे लागतात. प्रत्येक टप्प्यावर काही ना काही मिळत असते. कधी बक्षीस मिळते, कधी प्रमाणपत्र मिळते, कधी व्यासपीठावर सत्कार होतो. पण काही क्षण असे असतात जे बक्षिसापेक्षा मोठे असतात. ते थेट हृदयाला स्पर्श करतात. माझ्या आयुष्यात असाच एक क्षण नुकताच आला आणि मी अंतर्मनातून म्हणालो - "मी धन्य झालो!"17 सप्टेंबर : केवळ एक तारीख नाही, तर प्रेरणा आहेमराठवाड्याच्या इतिहासात 17 सप्टेंबर या तारखेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. 1948 साली याच दिवशी निजामाच्या 24 वर्षांच्या जुलमी राजवटीतून मराठवाडा मुक्त झाला. हैदराबाद मुक्तिसंग्रामात स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, बाबासाहेब परांजपे, देवीसिंग चौहान यांसारख्या अनेक ज्ञात-अज्ञात हुतात्म्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. म्हणूनच हा दिवस आमच्यासाठी केवळ सुट्टीचा दिवस नाही, तर स्वाभिमानाचा आणि बलिदानाचा दिवस आहे.याच पवित्र दिनाच्या अमृत महोत्सवी पर्वात माझ्या गावच्या ग्रामपंचायतीने मला एक आगळीवेगळी जबाबदारी दिली - ध्वजारोहणाची.माझी शाळा - माझ्या जीवनाचा पायामाझे गाव... माझी माती. या मातीतच माझे बालपण गेले. गावच्या जिल्हा परिषदेच्या शाळेत माझे प्राथमिक शिक्षण झाले. त्या शाळेच्या पत्र्याच्या वर्गखोल्या, फुटक्या फळ्यावर पांढऱ्या खडूने लिहिणारे गुरुजी, दुपारच्या सुट्टीत झाडाखाली बसून खाल्लेली भाकरी - हे सगळे आजही माझ्या मनात ताजे आहे.पायात चप्पल नाही, अंगात फाटका सदरा, पण डोळ्यात शिकण्याची प्रचंड जिद्द घेऊन मी शाळेत जायचो. त्या शाळेनेच मला घडवले. आज मी जे काही आहे, प्राध्यापक, म्हणून, लेखक म्हणून, सामाजिक कार्यकर्ता म्हणून ओळखला जातो, त्याचा पाया त्याच शाळेने रचला आहे.आणि योगायोग बघा, त्याच शाळेच्या प्रांगणात ग्रामपंचायत कार्यालयासमोर माझ्या हस्ते ध्वजारोहण होणार होते.17 सप्टेंबरची सकाळ. शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वच्छ गणवेश घालून शिस्तीत रांगा लावल्या होत्या. राष्ट्रगीत, राज्यगीत, मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या घोषणा... वातावरणात एक वेगळेच चैतन्य होते.सरपंच मा. अनंतराव हुसे यांनी मला ध्वजदोरीकडे येण्याची विनंती केली. मी पुढे गेलो. ध्वजाला सलामी दिली आणि दोरी ओढली. तिरंगा हळूहळू वर जात होता आणि माझे मन मात्र भूतकाळात मागे जात होते.लहानपणी याच मैदानात मी प्रार्थनेच्या रांगेत उभा असायचो. गुरुजी ओरडायचे - "सरळ उभा रहा!" आज त्याच मैदानात सगळ्यांच्या नजरा माझ्यावर होत्या. त्या क्षणी माझा हात थरथरत होता, पण तो भीतीने नव्हे, तर कृतज्ञतेने थरथरत होता. डोळे पाणावले होते.शिक्षक म्हणून मिळालेला मोठा सन्मानगेल्या 20-25 वर्षांच्या माझ्या शैक्षणिक वाटचालीत अनेक पुरस्कार मिळाले. जिल्हा, राज्य पातळीवर सत्कार झाले. पण त्या सगळ्यांपेक्षा हा सन्मान वेगळा होता. कारण हा सन्मान माझ्या माणसांनी दिला होता. ज्यांनी मला लहानपणापासून पाहिले, ज्यांनी मला घडताना पाहिले, त्यांच्यासमोर सन्मानित होणे यासारखे भाग्य नाही.मी पेशाने शिक्षक आहे. शिक्षकाचा सर्वात मोठा पुरस्कार कोणता असेल, तर तो म्हणजे त्याच्या विद्यार्थ्याने आणि त्याच्या समाजाने त्याला दिलेली आपुलकी. ती आपुलकी मला त्या दिवशी भरभरून मिळाली.यावेळी मी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. मी त्यांना सांगितले, "मुलांनो, मुक्तिसंग्राम म्हणजे काय? केवळ निजामापासून मुक्ती नाही. तर अज्ञानापासून मुक्ती, अंधश्रद्धेपासून मुक्ती, गरिबीपासून मुक्ती. आणि या मुक्तीचे एकमेव साधन म्हणजे शिक्षण. तुम्ही मन लावून शिका. मोठे व्हा. पण मोठे झाल्यावर आपले गाव, आपली शाळा कधीही विसरू नका."एखादा कार्यक्रम यशस्वी होतो तो नियोजनामुळे. या कार्यक्रमाचे नियोजन अतिशय अप्रतिम होते. शाळेचे मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षकांनी गेल्या आठ दिवसांपासून तयारी केली होती. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, माझे लहान बंधू समान असलेले मा. मुकुंदराव हुसे यांनी सर्वांना सोबत घेऊन उत्तम समन्वय साधला होता.गावातील ग्रामस्थ, महिला मंडळ, युवक मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम केवळ शाळेचा नव्हता, तर तो संपूर्ण गावाचा उत्सव झाला होता.माणूस आयुष्यात खूप काही कमावतो - पैसा, प्रसिद्धी, पद. पण शेवटी उरते ती माणुसकी आणि मातीशी असलेली नाळ. ती नाळ मी कधीही तुटू देणार नाही.माझ्या मातीनं आणि माझ्या माणसांनी मला दिलेला हा अनमोल बहुमान माझ्या हृदयात कायमचा कोरला गेला आहे. हा सन्मान माझी जबाबदारी वाढवणारा आहे. माझ्या गावातील एकही मूल शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी मी माझ्या परीने प्रयत्न करत राहीन.

**डॉ. शिवाजी हुसे**
**कन्नड**

## पत्रकार स्व. सुरेश केवट यांच्या पुण्यस्मरण निमित्त उपक्रम



**कन्नड :** गणितासारखा क्लिष्ट अवघड वाटणारा विषय सोपा व्हावा यासाठी गणित लॅब मधील शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांना आकृष्ट करणारे आणि मनोरंजक असल्याने विषय अधिक सोपा होईल पत्रकार स्व. सुरेश केवट यांच्या पुण्य स्मरणार्थ शाळेत गणित लॅब ची उभारणी हा अत्यंत चांगला उपक्रम राबविला असून खऱ्या अर्थाने हे अभिवादन असल्याचे मत माजी सभापती तथा सरपंच अशोकराव दाबके यांनी व्यक्त केले. जिल्हा परिषद प्रशाला अंधानेर ता. कन्नड येथे गणित कक्ष (मॅथ लॅब ) चे माजी सरपंच अशोकरावं दाबके यांच्या हस्ते उदघाट्न करण्यात आले. या प्रसंगी ते बोलत होते. पत्रकार स्व. सुरेश केवट यांच्या आठव्या पुण्यस्मरणार्थ इयत्ता सदर गणित कक्ष उभारण्यात आला.पत्रकार स्व. सुरेश केवट यांच्या पुण्यस्मरण निमित्त दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक राजीव जाधव तर प्रमुख पाहुणे म्हणून शालेय व्यवस्थापण समितीचे उवध्यक्ष वहिदोद्दीन शेख, तंटा मुक्ती अध्यक्ष संजय पांडे,माजी अध्यक्ष गोरखभाऊ करवंदे यांची उपस्थिती होती. मुख्याध्यापक राजीव जाधव म्हणाले की अशा गणित प्रयोग शाळेमुळे विद्यार्थ्यांना पुस्तकातील क्लिष्ट प्रमेय सिद्धांत हे प्रत्यक्ष कृतिद्वारे स्वतः पडताळून पाहता येतात गणिता सारखा रुक्ष वाटणाऱ्या विषयात गोडी निर्माण होते. तर माजी सरपंच तथा प्रशासक अशोकराव दाबके म्हणाले की स्व. सुरेश केवट यांनी पत्रकारितेतुन अनेक सामाजिक समस्या सोडविल्या.आज त्यांच्या पुण्यस्मरण निमित्त त्यांच्या कामास पुढे नेण्यात येत आहे हेच खरे अभिवादन आहे.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन दिपक सोनवणे यांनी केले तर आभार मुख्याध्यापक राजीव जाधव यांनी मानले यावेळी प्रशालेचे शिक्षक नारायण दांगट, मछिंन्द्र डिघोळे, सतीश कापुरे,रामभाऊ गुढेकर, सुयश अहिरराव,जावेद पटेल,परिचर शेख अष्पाक यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.छायाचित्र - गणित प्रयोगशाळेतील शैक्षणिक साहित्य गणितीय मॉडेल्स बघताना अशोकराव दाबके, मुख्याध्यापक राजीव जाधव, संजय पांडे,वाहिदोद्दीन शेख,गोरखभाऊ करवंदे आणि मान्यवर.







महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १८ सप्टेंबर २०२६

# इतिहास : हैद्राबाद मुक्तीसंग्रामाचा..!

आज १७ सप्टेंबर म्हटले की, आपण लगेच नाव उच्चारतो " मराठवाडा मुक्तिसंग्राम" ! परंतु तो मराठवाडा मुक्तिसंग्राम नसून "हैद्राबाद मुक्तिसंग्राम" आहे. १७२४ ते १९४८ अशी सलग २२४ वर्षे आपल्या भागावर हैदराबादच्या निजामाची सत्ता होती. मग हा निजाम म्हणजे कोण ? हे ही माहीत असले पाहिजे. त्यानुसार निजाम हे काही कुठल्या व्यक्तीचे नाव नसून ती एक पदवी आहे. दिल्लीच्या मोगल बादशाहने आपला दक्षिणेचा सुभेदार मीर कमरुद्दीन खानाला निजाम उल मुल्क ही पदवी दिली होती. त्यामुळे त्याला निजाम म्हटले गेले. वास्तविक पाहता २०० वर्षात एकूण सात जणांनी निजामशाहिचा कारभार केला. आणि त्या प्रत्येकाने स्वत:ला निजाम ही पदवी लावली. त्यामुळे निजाम हे कोण्या एका व्यक्तीचे नाव नसून ती एक पदवी आहे. निजाम या शब्दाचा अर्थ होतो व्यवस्थापक ! मुल्क म्हणजे जमीन किंवा परिसर. आणि त्यानुसार परिसराची व्यवस्था पाहणारा म्हणजेच निजाम. त्यानुसार दिल्लीच्या मोगल बादशहाचा दक्षिणेतील एक महसुली अधिकारी म्हणजेच निजाम. १७२४ला मोगलांचा सुभेदार म्हणून काम करताना पहिला निजाम मीर कमरुद्दीन खानाने औरंगाबाद याठिकाणी स्वत:ची स्वतंत्र गादी निर्माण केली. १७६४ नंतर निजामाने आपला कारभार हैद्राबाद येथून चालवायला सुरुवात केली. निजाम हा धर्माने मुस्लीम असलातरी त्याच्याकडे अनेक नामांकित हिंदू सरदारांनी शेवटपर्यन्त चाकरी केलेली आहे. त्यात छत्रपती संभाजीच्या बहीणीचे नातू रावरंभा निंबाळकर, सेनापती धनाजी जाधवाचे पुत्र चंद्रसेन जाधव, फलटणच्या निंबाळकरांचे वारसदार सुलतानजी निंबाळकर, औरंगजेबाच्या तंबूचे कळस कापून आणणाऱ्या हिम्मतबहादद्दूर विठोजी चव्हाणांचे चिरंजीव उदाजी चव्हाण यासारख्या दिग्गजांचा समावेश होतो. १५ऑगस्ट १९४७ म्हणजेच स्वातंत्र्यापर्यन्त भारतात निजामासारखी जवळपास ५६५ संस्थाने होती. स्वातंत्र्यानंतर बहुतेकांनी स्वत:ला भारतात विलीन करून घेतले. एक वर्ष उजाडलेतरी हैदराबादचा निजाम काही भारतात सामील व्हायला तयार नव्हता. त्यामुळे निजाम संस्थांनातील जनतेने निजामाविरोधात जो लढा दिला त्यालाच " हैद्राबाद मुक्तिसंग्राम" म्हटले जाते. १९४८ ला हैद्राबादच्या निजामाचे शासन हे देशातील सर्वात श्रीमंत संस्थान होते. १९४१च्या जनगणनेनुसार निजाम राज्याचे एकूण क्षेत्रफळ ८२ हजार ६९४ चौरस मैल इतके होते. जे इंग्लंड आणि स्कॉटलंड देशाच्या दुप्पट भरते. या निजाम राजवटीत संपूर्ण आंध्र प्रदेश, तेलंगणा, मराठवाडा आणि दक्षिण कर्नाटकातील तीन जिल्हे मिळून एकूण १६ जिल्ह्याचा समावेश होता. २२हजार ३६० खेड्यात मिळून या संस्थानची लोकसंख्या १ कोटी, ६३ लाख, ३८ हजार, ५३४ एवढी होती. त्यात ८५ % हिंदू तर १२ % मुस्लीम होते. त्यामुळे उर्दू भाषिकांची संख्या ही फक्त १०% असलीतरी राज्यकारभाराची भाषा उर्दूच होती. यावेळी मराठवाड्याच्या पाच जिल्ह्यातील लोकसंख्या ५२ लाख १९ हजार ५२८ होती. एकूण क्षेत्रफळाच्या ४२ % भाग हा जमीनदाराच्याच मालकीचा होता. त्यामुळे उस्मानाबाद जिल्हयातील उस्मानाबाद, परंडा आणि कळंब हे तालुके निजामाचे सर्फेखास म्हणजे वैयक्तिक उत्पन्नाचे तालुके होते. तर या सोबतच गुंजोटी आणि लोहारा हे तालुके निजामाच्या पायग्याचे म्हणजे खाजगी संरक्षक पथकाच्या जहागिरीचे तालुके होते. त्यामुळे उस्मानाबाद जिल्हा म्हणजे निजामाची खाजगी जहागीर होती. अशाप्रकारच्या जहागिरीतून निजामाला दरवर्षी १५ कोटीचे उत्पन्न मिळत होते. हैद्राबाद संस्थानचा आढावा घेतल्यास असे दिसून येते की, १८८३ पासून हे संस्थान इंग्रजांच्या धर्तीवर राज्यकारभार करणारे शासन असून मीर महेबूबअली पाशा हा मोठा सुधारणावादी धोरणाचा होता. त्यामुळे महसूल, अबकारी, अर्थ,कस्टम, स्टॅम्प, न्यायदान, तुरुंग, पोलिस, टपाल, शिक्षण, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, पाटबंधारे, रेल्वे याप्रमाणे २१विभाग काढून त्याद्वारे गावपातळीपर्यंत प्रशासन व्यवस्था राबविली. त्यामुळे १९१० पर्यंत निजामाकडे जमा होणारा महसूल हा २ कोटी ८९ लाख ४३ हजार इतका होता. अगदी २ आण्याचे नाणेही चांदीचे असून त्याचे वजन १.३९ ग्रॅम होते. त्यावर M आणि K अशी अक्षरे कोरलेली होती. M म्हणजे महबूब अली आणि K म्हणजे मुल्क. याशिवाय निजामाच्या काळात १५ आण्याचा १ रुपया होता. त्यामुळेच त्याकाळी सोळा आणे काम झाले, अशाप्रकारची म्हण रूढ झाली. सहावा निजाम मीर महबूबअली हा येवढा शक्तीशाली होता की, इटली, फ्रांस, ओष्ट्रीया, इंग्लंड यासारख्या देशाचे राजपुत्र हे त्याचे खाजगी मित्र होते. १९ पर्यंत गादीवर असणारा सहावा निजाम हा कपडे लत्ता आणि शिकारीचा शौकीन असून त्याने त्याकाळी एकदा वापरलेला ड्रेस पुन्हा कधी वापरला नाही. याचवेळी वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळे सर्वसामान्य जनता ही अन्नावाचून तडफडून मरत होती. प्रशासन व्यवस्था ही आजच्याप्रमाणेच असून त्याकाळी जिल्हा अधिकाऱ्याला तालुकदार म्हणत असत. गावचा कारभार हा पाटील आणि पटवारी यांच्या हातात होता. पोलिस, लष्कर, रेल्वे, टपाल वगैरे यंत्रणेमुळे निजामाचे शासन हे अगदी एखाद्या देशाच्या तोडीचे होते. म्हणूनच देशातील ५६५ संस्थानात २१ तोफांच्या सलामीचा मान हा म्हैसूर, बडोदा आणि हैदराबादच्या निजामाला होता. १८०० साली इंग्रजाबरोबर तैनाती फौजेचा करार केल्याने निजमावर पुर्णपणे इंग्रजांचे वर्चस्व असलेतरी निजामाने इंग्रजालाही झुलवत ठेवून आपला कार्यभाग साधून घेतला. संरक्षणाची जबाबदारी ही इंग्रजाकडे दिल्याने इंग्रजांनी हैद्राबादजवळ सैन्याची स्वतंत्र छावणी निर्माण केली. निजामाच्या मुलाच्या नावाने त्या भागाला सिंकंदराबाद हे नाव पडले. निजाम संस्थानचा कारभार हा एखाद्या देशाच्या कारभाराप्रमाणे असून १८०० साली आपल्या ताब्यातील प्रत्येक गावात निजामाने पिण्याच्या पाण्याकरिता अतिशय मजबूत अशा आडाची निर्मिती केली. ते आड आजही मराठवाड्यातील प्रत्येक गावात पहायला मिळतात. तर दुष्काळग्रस्त भागाकडेही त्यांचे लक्ष असून १९०५ साली पडलेल्या दुष्काळात निजामाने २८०००० रुपये खर्च करून तुळजापूरच्या घाटाचे काम पूर्ण केले. अशाप्रकारची अनेक कामे त्यांनी समाजासाठी पूर्णत्वास नेली. १९११ ते १९४८ ला हैदराबादच्या गादीवर सातवा निजाम मिर उस्मानअली गादीवर असून तो जगातल्या १० श्रीमंतापैकी एक होता. त्याच्याही कालखंडात हैद्राबाद संस्थानात अनेक सुधारणा होऊन छोट्या मोठ्या गावात शिक्षणाची सोय झाली. हैद्राबादला उस्मानिया विद्यापीठाची निर्मिती झाल्याने संस्थांनातील मुलांना उच्च शिक्षणाची सोय झाली. उस्मानाबाद जिल्ह्यातील गुंजोटीचे श्री कृष्ण विद्यालय १९२१ सालचे आहे. निजाम राजवटीत विज्ञान आणि गणितबरोबरच अखलियात नावाचा विषय शिकणे अनिवार्य होते. ज्यात नीतीमत्तेचे धडे गिरवले जायचे, यातनापास झालातर त्याला नाकाम अखलियात म्हटले जायचे. विशेष नोंद घेण्यासारखी बाब म्हणजे निजाम राजवटीतील प्राथमिक शिक्षण हे निशुल्क होते. शाळेतील प्रार्थना मात्र निजामाला दुवा मागण्याची असायची.खिचर की उम्र हो तुझकोआना बख्त सिंकदर हो ।याचा अर्थ होतो " दीर्घायु होऊ दे निजाम प्रभूला, हीच मागणी माझी ईश्वराला." राज्यकर्ते मुस्लिम असलेतरी गावपातळीवर सर्वकाही व्यवस्थित होते. न्याय निवाडा निस्पक्षपाती होता. गावचा पाटील गावात न्याय द्यायचा. सरकारी कार्यालयाचा तसा संबंध यायचा नाही. परंतु आलाच तर तातडीने काम व्हायचे. रस्ते, रेल्वे यासारख्या सोयी झाल्याने माणसाचा संपर्क वाढला होता. निजामाची प्रशासनावरील पकड मजबूत असल्याने इथं चले जाव, मिठाचा सत्याग्रह, भारत छोडो ही गांधीजींची आंदोलने झाली नाहीत. दुसऱ्या महायुद्धांनंतर संपूर्ण भारत देश इंग्रजांच्या विरोधात पेटलेला असताना निजाम राजवटमात्र अगदी स्थिर होती. १९४६ पर्यन्त सर्व काही व्यवस्थित चालू होतं. मध्येच रझाकार नावाच्या संघटनेचा उदय झाला आणि निजाम संस्थांनातील वातावरण पार बदलून गेले. निजाम राजवट बरी म्हणणारे लोकही आता रझाकारांचे बळी चालले. पाहता पाहता रझाकारांनी संपूर्ण हैद्राबाद संस्थान आपल्या हातात घेतले. १९४६ ते १९४८ अशी दोन वर्षे संपूर्ण जनता यांच्या अत्याचाराला बळी पडली. गावोगाव अन्याय अत्याचार याला सीमा राहिली नाही. एका बाजूला सारा हिंदुस्तान स्वातंत्र्याचा आनंद साजरा करतोय तर त्याचवेळी निजाम राजवटीतला माणूस जगण्यासाठी धडपडतोय अशा वातावरणात गावातील सर्वसामान्य माणूस जागा व्हायला लागला. आणि त्यातूनच भारतातील एक्या अदभूतपुर्व अशा लढ्याला सुरुवात झाली. त्याला " हैद्राबाद मुक्तिसंग्राम" म्हटले जाते. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण संस्थानात उठावाला सुरुवात झाली. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली लढ्याची सुरुवात झाली असलीतरी शेवटची १८महिने ते तुरुंगातच होते. त्यामुळे निजामाच्या विरोधात आता एकसंघ उठवाबरोबरच गावोगावचा सर्वसामान्य माणूस पेटून उठला. त्यामुळे १९४७ – ४८ चा कालखंड हा संपूर्ण निजामशाहीसाठी आणि त्यातल्या त्यात उस्मानाबादसाठी अतिशय खडतर असा होता. रझाकारासारख्या अतिशय क्रूर संघटनेला सामान्य माणसाने अंगावर घेतले. आणि तेथूनच सुरू झाला सूडाचा प्रवास. जे शिकले त्यांचा इतिहास पुस्तकात आला परंतु अनेक अशी मंडळी आहे त्यांना अजूनही इतिहासाने न्याय दिला नाही. एका एका गावची १५ - २० माणसं रझाकारांनी कापून काढली, जीवंत जाळली तरी त्याची कुठे नोंद नाही. अशा या दुर्लक्षित वीरांना आजच्या दिवशी भावपूर्ण आदरांजली.!



**प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे**
**जेईएस महाविद्यालय जालना**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १८ सप्टेंबर २०२६


# श्रीमंत नाना



लॉकडाऊनचा तो प्रदीर्घ, कोंदट आणि माणसाला माणसापासून तोडणारा काळ संपल्यानंतर जेव्हा पुन्हा गावाकडची वाट मोकळी झाली, तेव्हा मनात एकच अनामिक ओढ दाटून आली होती, ती म्हणजे आपल्या माणसांना भेटण्याची. शहराच्या धावपळीत, नोकरीच्या व्यापात, ध्येयाच्या मागे धावताना आपण आपली मूळ माणसे, आपली नाती, आपल्या गावाचा गंध कुठेतरी मागे टाकून पुढे जात असतो. आपल्याला वाटते आपण खूप पुढे गेलो, पण गावाच्या हद्दीत पाय ठेवताच कळते की आपले खरे वैभव तर तिथेच आहे. त्या मातीचा सुगंध मनाला आपल्या जेष्ठांची, प्रतिष्ठित नागरिकांची, आपल्या वडीलधाऱ्यांची आठवण करून देतो. त्यांना भेटावे, त्यांच्याशी चार सुखदुःखाच्या गोष्टी बोलाव्यात, त्यांचे अनुभवाचे बोल ऐकावेत, त्यांच्या आशीर्वादाने मन शांत करावे असे मनापासून वाटू लागते. बऱ्याच दिवसानंतर तो योग जुळून आला. गावाकडे गेल्यावर गावातील अनेक जेष्ठांना भेटण्याची संधी मिळाली आणि त्याच ओढीने मी आमच्या गावच्या एका अत्यंत तेजस्वी, तपस्वी आणि वंदनीय व्यक्तिमत्त्वाची भेट घेतली. ती व्यक्ती म्हणजे श्री. श्रीमंतराव पा. हुसे.ही भेट घडवून आणण्यात त्यांचे मोठे चिरंजीव महादेव पा. हुसे यांचा मोठा वाटा आहे. महादेवने मोठ्या आग्रहाने आणि अत्यंत प्रेमपूर्वक ही भेट घडवून आणली. खरं तर आजच्या काळात जिथे नाती दुरावत चालली आहेत, तिथे महादेवची आपल्या वडिलांविषयी असलेली आदराची, श्रद्धेची आणि सेवेची भावना पाहून मन अगदी भरून आले, सुखावले. गावात, पंचक्रोशीत आणि आमच्या संपूर्ण नातेवाईकांमध्ये श्रीमंतराव पा. हुसे यांना कोणी त्यांच्या पूर्ण नावाने ओळखतच नाही. सगळे त्यांना एकाच नावाने ओळखतात, ते म्हणजे श्रीमंत नाना. या दोन शब्दांतच त्यांच्याविषयी असलेला आदर, प्रेम, आपुलकी आणि दरारा सामावलेला आहे. हे नाव घेताच डोळ्यांसमोर एक प्रसन्न, सात्विक, करारी आणि तेजस्वी चेहरा उभा राहतो. कपाळावर अस्टगंधाचा टिळा, अंगात पांढरा स्वच्छ सदरा आणि डोळ्यात एक विलक्षण शांतता.गावाच्या अगदी मध्यभागी, गावाच्या हृदयाच्या ठिकाणी त्यांचा प्रशस्त आणि ऐतिहासिक वाडा आहे. त्या वाड्याच्या भिंतींनी अनेक पिढ्यांचा इतिहास पाहिला आहे, अनेक चढउतार पाहिले आहेत, अनेक सुखदुःखाच्या गोष्टी अनुभवल्या आहेत. त्या वाड्याच्या दगडांमध्येही एक वेगळीच ऊब आहे. त्यांच्या उमेदीच्या काळात, त्यांच्या तारुण्यात त्यांचे वैभव, त्यांचा रुबाब आणि त्यांचा दरारा आम्ही आमच्या लहानपणी डोळ्यांनी पाहिला आहे. वाड्यात नेहमीच लोकांची वर्दळ असायची. कोणाचा वाद असो, कोणाची अडचण असो, कोणाला सल्ला हवा असो, लोक थेट वाड्यावर यायचे. अडल्या नडलेल्याला आधार मिळायचा, भुकेल्याला घास मिळायचा. आजही त्या वाड्यात गेल्यावर एक वेगळेच प्रसन्न, पवित्र आणि शांत वातावरण अनुभवायला मिळते. काल मी त्यांना भेटण्यासाठी म्हणून त्यांच्या घरी गेलो तेव्हा जे दृश्य पाहिले ते मनात कायमचे कोरले गेले. दुपारची वेळ होती. घरात एक निरव शांतता होती. आणि त्या शांततेत ते आपल्या नेहमीच्या सवयीप्रमाणे एका शांत कोपऱ्यात, खिडकीजवळ येणाऱ्या उन्हात बसून वाचन करण्यात तल्लीन झाले होते. हातात ज्ञानेश्वरीचा ग्रंथ होता. वयाच्या या टप्प्यावरही डोळ्यावर चष्मा लावून, एकाग्र चित्ताने, प्रत्येक ओवीवर चिंतन करत वाचन करणारे नाना पाहून असे वाटले की वाचन हेच त्यांच्या जीवनाचे खरे वैभव आहे, खरी श्रीमंती आहे. ज्याला श्रीमंत म्हटले जाते ती श्रीमंती पैशाची नाही, तर विचारांची आहे.श्रीमंत नाना यांचे खरे आणि संपूर्ण रूप उलगडते ते वारकरी संप्रदायाशी असलेल्या त्यांच्या अतूट नात्यातून. ते वारकरी संप्रदायाचे केवळ अनुयायी नाहीत, तर त्या भगव्या पताकेचे निष्ठावंत पाईक आहेत, शिलेदार आहेत. वारकरी विचार त्यांच्या केवळ मनात नाही तर त्यांच्या रोमारोमात, रक्तात भिनला आहे. त्यांच्या बोलण्यात विठ्ठलाच्या नामाचा गजर असतो, त्यांच्या आचरणात संतांच्या शिकवणीचा ओलावा असतो, त्यांच्या वागण्यात वैराग्याची झलक असते. गावात किंवा परिसरात कुठेही अखंड हरिनाम सप्ताह असेल, कीर्तन महोत्सव असेल, भागवत कथा असेल, ज्ञानेश्वरी पारायण असेल तर श्रीमंत नाना तिथे असणारच. त्यांची उपस्थिती त्या कार्यक्रमाची शोभा वाढवते, त्याला एक वेगळेच पावित्र्य आणि वजन प्राप्त होते. गावात जर कधी कोणते थोर संत, वैराग्यमूर्ती किंवा कीर्तनकार महाराज आले तर त्यांचा मुक्काम हमखास श्रीमंत नानांच्याच वाड्यात असतो. हा काही केवळ योगायोग नाही. हा त्यांच्या सेवाभावाचा, त्यांच्या आतिथ्यशीलतेचा आणि परमार्थावरील असलेल्या त्यांच्या अपार निष्ठेचा लोकांनी दिलेला सन्मान आहे. पंढरीची आषाढी आणि कार्तिकी वारी, पैठणची नाथषष्ठी, संत भगवान बाबांची पुण्यतिथी, अटाळकर महाराजांची पुण्यतिथी, बाळकृष्ण महाराजांची पुण्यतिथी अशा प्रत्येक धार्मिक आणि पारमार्थिक कार्यक्रमात ते अत्यंत सक्रियपणे सहभागी होतात. वारीला जाणे चुकवत नाहीत. त्यांची आणखी एक मोठी आणि विलक्षण ओळख म्हणजे ते संत वाङ्मयाचे चालते बोलते विद्यापीठ आहेत, एक जिवंत ग्रंथालय आहेत. त्यांना वाचनाची विलक्षण आणि मनापासून आवड आहे. सतत काहीतरी वाचत राहणे हा त्यांचा स्थायीभाव बनला आहे. मोबाईल आणि टीव्हीच्या या जमान्यात जिथे वाचन लोप पावत चालले आहे, तिथे नाना आजही ग्रंथांना आपले मित्र मानतात. त्यांच्या घरातील एका कपाटात संत साहित्याचा एक मोठा खजिनाच दडलेला आहे. जगद्गुरु संत तुकाराम महाराजांची संपूर्ण सार्थ गाथा, ज्ञानेश्वरी, दासबोध, एकनाथी भागवत, तुकाराम बाबांचे, गाडगे बाबांचे चरित्र, संत भगवान बाबांवरील साहित्य असे अनेक दुर्मीळ आणि अमूल्य ग्रंथ त्यांनी अत्यंत जपून आणि काळजीपूर्वक संग्रही ठेवले आहेत. आणि हे ग्रंथ केवळ कपाटाची शोभा वाढवण्यासाठी ठेवलेले नाहीत. त्यांनी प्रत्येक ग्रंथाचे अनेक वेळा पारायण केले आहे, त्यावर चिंतन केले आहे, मनन केले आहे. त्यामुळेच अनेक अभंग, अनेक ओव्या त्यांना तोंडपाठ आहेत. एखाद्या विषयावर चर्चा चालू असताना ते मध्येच अगदी योग्य आणि समर्पक असा अभंग इतक्या सहजतेने, योग्य चालीत म्हणून दाखवतात की ऐकणारा मंत्रमुग्ध होऊन जातो. अभंगाच्या अर्थाची फोड ते इतक्या सोप्या, ग्रामीण आणि मधाळ भाषेत करतात की सामान्यातल्या सामान्य माणसालाही त्याचा गूढार्थ लगेच समजतो.कालच्या भेटीत आम्ही जवळजवळ दोन तास गप्पा मारल्या. वेळ कसा गेला कळलेच नाही. संत साहित्य, आजच्या शेतीची अवस्था, संत भगवान बाबांचे कार्य, भीमसिंह महाराज, बाळकृष्ण महाराज, भानुदास महाराज अटाळकर यांच्याविषयीच्या अनेक जुन्या आठवणी आणि अनुभव त्यांनी अगदी भरभरून सांगितले. विशेषतः भगवान बाबा जेव्हा आमच्या गावात आले होते तेव्हाची आठवण सांगताना त्यांचा कंठ दाटून आला होता, डोळे पाणावले होते. तो प्रसंग, त्या वेळची गावातील भक्तिमय परिस्थिती, लोकांची श्रद्धा ते आजही अगदी जसाच्या तसा डोळ्यांसमोर उभी करतात. त्यांच्या बोलण्यात केवळ कोरडी माहिती नसते तर त्या माहितीला पन्नास-साठ वर्षांच्या अनुभवाची आणि अढळ श्रद्धेची जोड असते. म्हणूनच त्यांचे बोलणे ऐकत रहावेसे वाटते.शेती हा त्यांच्या जीवनाचा आणखी एक महत्त्वाचा आणि अभिमानाचा पैलू आहे. ते एक अत्यंत उत्तम, कष्टाळू आणि प्रगतशील शेतकरी आहेत. शेतीकडे त्यांनी कधीही केवळ पोट भरण्याचे साधन किंवा व्यवसाय म्हणून पाहिले नाही तर त्या काळ्या आईची त्यांनी मनोभावे आणि निष्ठेने सेवा केली आहे. आपल्या शेतात नवनवीन प्रयोग करणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक उत्पादन कसे घेता येईल याचा विचार करणे आणि इतर लहान शेतकऱ्यांना त्याचे मार्गदर्शन करणे हा त्यांचा स्वभाव आहे. त्यामुळेच त्यांना आजही पंचक्रोशीत प्रगतशील शेतकरी म्हणून मोठ्या आदराने ओळखले जाते. त्याचबरोबर ते एक संवेदनशील आणि जागरूक समाजचिंतकही आहेत. गावातील कोणतेही सामाजिक कार्य असो, शाळेचा प्रश्न असो, मंदिराचा जीर्णोद्धार असो, कोणताही सार्वजनिक प्रश्न असो, एखादा वाद असो, त्यात ते आवर्जून सहभागी होतात. गावाच्या विकासाचा, गावाच्या एकोप्याचा ते नेहमी विचार करतात. त्यांचा सल्ला हा गावातील तरुणांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांसाठी मोलाचा आणि अंतिम असतो. त्यांच्या शब्दाला गावात खूप मान आहे, वजन आहे, कारण त्या शब्दामागे कोणताही स्वार्थ नसतो, तर केवळ निर्मळ आणि शुद्ध हेतू असतो. म्हणूनच गावातील प्रत्येकाच्या मनात त्यांच्याविषयी प्रचंड प्रेम आणि नितांत आदर आहे.त्यांचे खरे यश आणि त्यांची खरी श्रीमंती त्यांच्या कुटुंबात दिसून येते. त्यांनी आपल्या पुढच्या पिढीवर अतिशय सुंदर आणि उच्च संस्कार केले आहेत. त्यांचे दोन्ही चिरंजीव महादेव हुसे आणि प्रमोद हुसे हे त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून वाटचाल करत आहेत. वडिलांविषयीचा आदर, त्यांची सेवा करण्याची वृत्ती, परमार्थाची आवड, शेतीवरील निष्ठा आणि सामाजिक बांधिलकी हे सर्व गुण त्यांनी आपल्या वडिलांकडून वारशाने घेतले आहेत. आजच्या विभक्त कुटुंब पद्धतीच्या काळात त्यांचे एकत्र कुटुंब हे एक आदर्श आहे.मागच्या भेटीत त्यांनी मला एक गोष्ट आवर्जून सांगितली की ते माझे लेखन नियमित वाचतात. भेटल्यावर त्यावर ते चर्चा करतात, चुकत असेल तिथे प्रेमाने समजावून सांगतात आणि चांगले लिहिले असेल तर मनापासून आणि भरभरून कौतुक करतात. माझ्यासारख्या लेखकासाठी ही खूप मोठी प्रेरणा आणि ऊर्जा देणारी गोष्ट आहे. यावेळी मी त्यांना तिफणचे काही नवीन अंक भेट म्हणून दिले, त्यांनी ते मोठ्या आपुलकीने आणि आनंदाने स्वीकारले. आजही वयाच्या या टप्प्यावर घरी बसून ज्ञानेश्वरीचे वाचन करणारे आणि संत विचारांचा जागर आपल्या आचरणातून करणारे श्रीमंत नाना हे आमच्या गावचे खरे भूषण आहेत. अशी माणसे हीच आमच्या गावाची श्रीमंती आहे. अशा या ऋषितुल्य व्यक्तीला भेटून मनाला खूप शांती आणि समाधान मिळते. त्यांना उदंड आयुष्य लाभो हीच पांडुरंगाच्या चरणी प्रार्थना.


**डॉ. शिवाजी हुसे**
**कन्नड**